महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

जुलै-ऑगष्ट १९४८

अनुक्रमणिका

१.	वामनास आवाहन (कविता)—प्रा. भ. श्री. पंडित, एम्. ए.	२०६
२.	आता नविन निघाली तऱ्हा! (कविता)—पां. श्रा. गोरे	२०७
३.	संभ्रम (कविता)—शिरीष	२०८
४.	संकेत (कविता)—म. म. देशपांडे	२०८
५.	महात्मा गांधी—ना. मा. श्री. अणे	२०९
६.	केशवसुतांचा निसर्गविषयक रहस्यवाद—के. मा. आराधे, एम्. ए.	२१८
७.	नाटक आणि प्रेक्षक—गोमकाळे, एम्. ए. एल्एल्. बी.	२२५
८.	व्हॅम्पायर (लघुकथा)—द. चिं. सोमण	२३०
९.	कला आणि योग—वा. मा. दाभाडे, एम्. ए.	२३४
१०.	साहित्यसमालोचन—संपादक ...	२३७
११.	गुप्त सरस्वती—प्रा. ब. श्री. हुपरीकर, एम्. ए.	२३९
१२.	आधुनिक कवितेच्या निमित्ताने— मराठीच्या काव्यपरिसरांत—म. ना. लोही, बी. ए.	२४१
१३.	संपादकीय	२४५



अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वामनास आवाहन

—भवानीशंकर श्री. पंडित

ये पुन्हा, ये पुन्हा, ये पुन्हा वामना !
बळि बळीचा बळी घ्यावया ये पुन्हा.

अमित मत्तामदें दैत्य हा माजला
अपर लक्ष्मीपती म्हणुन हा गाजला
हाच दात्यांत की अग्रणी आजला
नादवुन नाणिं हा नाचवी त्रिभुवना.

अमर सत्ता परी यापुढे चळचळे
अढळ आसन तिचें सारखें डळमळे,
आजवरचें तिचें धैर्य अवघें गळे,
साह्य व्हाया करी ती तुझी याचना.

मूर्ति वामन तुझी किंतु कीर्ती महा,
सधन हा, अधन-तूं–शक्ति पण दुर्वहा,
पाडलीं दडप, कर भूमिगत दैत्य हा,
नष्ट कर याचिया राक्षसी शासना.

●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आता नविन निघाली तऱ्हा !

—पां. श्री. गोरे

दिवे गेले, शामदान गेलें
जुना जमाना विसरा पुरा
आता नविन निघाली तऱ्हा !
सख्या ! विजलिची मौज घरिं करा ! १

चुडे गेले, तसे गोठ गेले
कुठे काचेचें नांव न जरा
आता नविन निघाली तऱ्हा !
सख्या ! नव्या साजेशा बांगड्या भरा ! २

चोळ्या गेल्या, जाड साड्या गेल्या
काळ ब्लाउजचा दे इशारा
आता नविन निघाली तऱ्हा !
सख्या ! आणा वायलचें पातळ घरा ! ३

सरी गेली, टीक-दुशी गेली
चपलाहार शोभतो साजरा
आता नविन निघाली तऱ्हा !
सख्या ! या आंगठींत जडवा हिरा ! ४

* गोषा सारा ! लागूं द्या हो वारा !
बांधा घड्याळ नाजुक करा
आता नविन निघाली तऱ्हा !
सख्या ! मला घेउन सोबत फिरा ! ५

---

* मराठमोळ्यांत गोषा असतो, त्याचा संदर्भ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संभ्रम

—शिरीष

(कै. रवीन्द्रनाथ टागोरांच्या I know not how thou Singest या कवितेवरून–)

हृदयाच्या राजा ! सेवुनि तव मधु गान
व्याकुळतें अंतर होउनि अति बेभान
संगीत–उषेने उजळिलेंस तूं जगता
गानश्वास भरले तुझेच व्योमीं सातां !
काव्याचा मंगल निर्मल निर्झर स्रवतां
प्रस्तरा लंघुनी शांति देत मम चित्ता !
मानसीं मनीषा, ‘ गानीं समरस व्हावें ’
परि शब्द फुटेना कळे न कांय करावें !
जिंकिलेंस हृदया गान-सुधा वितरुनिया
घेरिलेंस मजला मोहक जालीं, राया !!

●

संकेत

—म. म. देशपांडे

बंद केलीं दारें
नका पाहूं डोकावुनी
चला परता माघारे १
नकोत मजला
शब्द सुके, मानासाठी
जीव जाहला भुकेला २
पडूं दे अंधार
बरा अंधार आंतला
अंध उजेड बाहेर ३
नाहीं तुम्हां थारा
आंत आंत अंतरांत
मज शोधूं द्या निवारा ४
लाभूं दे एकांत
भेटेल तो अंधारीं या
तसा ठरला संकेत ५

●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महात्मा गांधी

नामदार माधव श्रीहरि अणे,
गव्हर्नर, बिहार.

● बिहारचे गव्हर्नर ना. माधवरावजी अणे यांनी पुण्यश्लोक महात्मा गांधी यांच्यासंबंधीं लिहिलेले दोन लेख येथे देण्यांत येत आहेत. मूळ लेख इंग्रजींत लिहिलेले असून त्यांचा मराठींत स्थूल अनुवाद केलेला आहे. पहिला लेख पुण्यश्लोक गांधीजी हयात असतांना लिहिलेला असून दुसरा लेख त्यांच्या दुर्दैवी अंतानंतर लिहिलेला आहे.

(१)

महात्माजींशीं माझी पहिली मुलाखत

१९२० च्या ऑगस्टमध्ये भरलेल्या कलकत्ता काँग्रेसच्या खास अधिवेशनानंतर त्यांत मंजूर झालेल्या असहकारितेच्या ठरावांतील त्रिविध बहिष्काराविरुद्ध मी वऱ्हाडांत प्रचार करीत होतों. कलकत्त्यास या ठरावावर प्रतिकूल मत देणारा वऱ्हाड हा एकटाच प्रांत होता ! कलकत्याचें हें अधिवेशन व नागपूर-काँग्रेस यांत चार महिन्यांचा काळ गेला. त्या दरम्यान असहकाराचे पुरस्कर्ते व विरोधक या उभयतांनी आपापल्या बाजूस लोकमत वळविण्याचा प्रयत्न केला. कै. देशबंधु दास यांनी ठरावाबद्दल आपली तीव्र नापसंती व्यक्त केली होती ! बंगाल – व संपूर्ण हिंदुस्थान– यांतील विरोधकांचे तेच म्होरके होते. नागपूरचे डॉ. मुंजे, उमरावतीचे ना. खापर्डे, पुण्याचे रा. केळकर, मद्रासचे सत्यमूर्ति, पंजाबचे लाला लजपतराय व संयुक्त प्रांताचे पं. मदन मोहन मालवीय हे सर्वच या ना त्या कारणामुळे ठरावाच्या विरुद्ध होते. ज. जिना हेहि विरोधकांपैकीच होते. कै. दास यांनी नागपूर-काँग्रेसपूर्वी तेथील नगरभवनापुढील प्रचंड जाहीर सभेंत भाषण करून शाळा, कोर्टे व कायदेमंडळें यांवरील बहिष्काराचा निषेध केला होता. दुसऱ्या दिवशीं बेळगांवचे रा. गंगाधरराव देशपांडे यांचें मराठींत बहिष्काराचें समर्थन करणारें भाषण झालें. श्रोतृवृंदांतील एका विभागाने मी आपलीं मतें त्यांजपुढे मांडावी, अशी मागणी केली. मीहि तसें करण्याचें कबूल केलें. त्यानंतरच्या दुसऱ्या दिवशीं माझे मित्र रा. अळेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेंत मी भाषण करून त्रिविध बहिष्काराचें वैयर्थ्य स्पष्ट केलें. असहकाराच्या नांवाखाली नोकरशाहीपुढे शरणागति करण्याऐवजी सत्ता

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व ती गाजविण्याचें साधन जें राज्ययंत्र हीं दोन्ही काबीज करण्याचें कॉंग्रेसचें धोरण असलें पाहिजे, असें मी म्हणालों. या भाषणाचें सभेंत संमिश्र स्वागत झालें. सभेच्या एका विभागाने टाळ्या वाजवून माझ्या विचारांस अनुकूलता दर्शविली, तर दुसऱ्या विभागाने व्यासपीठावर जोडे फेकून आपली तीव्र नापसंती व्यक्त केली! जाहीर व्याख्यानांच्या या मोहिमेशिवाय कॉलेजच्या विद्यार्थ्यांशी माझ्या खाजगी मुलाखती होत होत्या. त्या सुमारास भरण्यांत यावयाच्या विद्यार्थी परिषदेंत असहकारितेच्या ठरावांतील शाळांवरील बहिष्काराच्या कलमास विरोध करण्यांत यावा, असें मी विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करीत होतों! विद्यार्थि-परिषदेच्या अध्यक्षपदासाठी कै. पं. मोतीलाल नेहरू व कै. लाला लजपतराय यांचीं नांवें सुचविण्यांत आलीं होती. पं. नेहरू हे त्रिविध बहिष्काराचे कट्टे पुरस्कर्ते होते. परंतु



लालाजींनी मात्र कलकत्ता-अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणांत कोर्टें व कायदे-मंडळें यांजवरील बहिष्कारास अनुमति देऊन शाळांवरील बहिष्कारास निश्चित विरोध दर्शविला होता! माझ्या मताचे लोक, विद्यार्थि–परिषदेच्या स्वागत–समितीने अध्यक्ष म्हणून पंडितजी ऐवजी लालाजींची निवड करावी, अशी खटपट करीत होते. स्वागत–समितीने बहुमताने लालाजींचीच निवड केली! याचा उघड अर्थ, नागपूरचे विद्यार्थि शाळांवरील बहिष्काराच्या विरुद्ध होते, असा होत होता! कै. शेठ जमनालालजी बजाज ज्यांचे मुख्य पुढारी होते, त्या वऱ्हाड–नागपूरच्या बहिष्कारवाद्यांना या निवडीने आश्चर्य वाटलें; आणि, विद्यार्थि–परिषदेंत व कदाचित् कॉंग्रेसमध्येहि या नवीन धोरणाचें भवितव्य कसें काय ठरेल, या विषयीं ते साशंक झाले! जमनालालजी हे नागपूर–कॉंग्रेसच्या स्वागत समितीचे अध्यक्ष होते. त्या थोर जबाबदारीमुळे ते साहाजिकच चिंतातूर होते, त्यांनी मला उपाध्यक्ष होण्या-बाबत विचारणा केली; आणि, मतप्रचाराचें स्वातंत्र्य असल्यास उपाध्यक्ष होण्याची मींहि तयारी दर्शविली. पण "तसें होऊं शकणार नाही!" असें जमनालालजींनीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मला लगेच कळविलें! खेरीज, ही जागा पत्करण्यामुळे तदनुषंगिक कर्तव्यें व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी मला पुष्कळच वेळ खर्च करावा लागला असता, हेंहि माझ्या लौकरच लक्ष्यांत आलें. तथापि नागपूर-कॉंग्रेसचें खुलें अधिवेशन व विषय-नियामक-समितीची बैठक यांतून कलकत्ता-ठरावास विरोध करण्यासाठी एक पक्ष निर्माण करण्याच्या हेतूने प्रांतांतील माझे जे मित्र नागपुरास जमले होते, त्यांच्या सभांस मी मधून मधून हजर राहत असे. जमनालालजींस हें ठाऊक होतें.

विरोधावर दुसरी तोड म्हणून त्यांनी एक उपाय योजला; गांधीजींनी कॉंग्रेस-पूर्वी बरेच आगाऊ नागपुरास येऊन निदान कांही ठळक विरोधक फोडण्याची संधी घ्यावी, अशी त्यांस विनंति करणें हा तो उपाय होता. त्यांची उपस्थिति व हिंदींतील त्यांचें वक्तृत्व यांचा जनमनावर होणारा परिणाम जमनालालजींनी खासच विचारांत घेतला असला पाहिजे.

नागपुरास येतांच गांधीजींनी कोणतीं प्यादीं कोठे सरकावयाचीं, याचा अंदाज घेऊन मान्याच्या जागाहि हेरल्या. असें म्हणतात कीं, विद्यार्थि परिषदेच्या कार्यकर्त्यांशी त्यांच्या एक-दोन मुलाखती झाल्या. त्यांतील एका मुलाखतींत कांही विद्यार्थ्यांनी शाळांवरील बहिष्कार आचरणांत आणण्यास आपण असमर्थ असल्यामुळे त्याच्या बाजूने मत देऊं शकत नाही, असें सांगितल्याचें समजतें! त्यावर गांधीजींनी जें उत्तर दिल्याचें कळलें, तें असें: एखादी व्यक्ति ठरावाची अंमलबजावणी करूं शकत नाही, हें तिचें दौर्बल्य त्या ठरावाच्या गुणग्रहणाच्या, किंबहुना, त्याच्या तर्फेने मतदान करण्याच्या आड येऊं शकत नाही! एखाद्या व्यक्तीने एखाद्या सूचनेस अनुमति दिल्यास तिने तदनुसार आचरण करण्याची अपेक्षा निर्माण होते, हें खरें; आणि दौर्बल्यामुळे तिजकडून अपेक्षाभंग झाल्यास तिची लोकदृष्ट्या किंमत कमी होते, हेंहि खरें. परंतु कातडी बचावण्यासाठी स्वतःस अडचणीच्या परिस्थितींत टाकण्याचें टाळून आणि दूरदर्शीच्या व हीन विचाराने उचित काळीं स्वमतप्रदान न करून एखादें सत्कार्य खुंटवून टाकण्यापेक्षा आपल्या दौर्बल्याखातर जनरोषाच्या अग्निदिव्यास सादर होणें चांगलें.-याप्रमाणे गांधीजी बोलल्याचें कळलें. ते आणखी असेंहि म्हणाल्याचें समजलें कीं, सदर ठरावाविरुद्ध मत देऊन तरुणांनी मात्राज्ञाभंग करूं नये! "कॉंग्रेसच्या मुखाने मातृभूमीच तुमच्याशीं बोलत आहे!" गांधी म्हणाले. ते बहुधा हिंदींतून विद्यार्थ्यांशीं जें काय बोलल्याचें सारांशरूपाने मला सांगण्यांत आलें होतें, त्याचा केवळ कांही भाग मी सुमारें पंचवीस वर्षांनंतर माझ्या भाषेंत स्मरणाने नमूद करीत आहें, हेंहि मला येथे सांगणें जरूर आहे.

वरील दोन युक्तिवादांपैकी शेवटचा युक्तिवाद मला नवीन नव्हता! कशावरहि विश्वास ठेवणाऱ्या व अशिक्षित अशा श्रोत्यांपुढे, भोसल्यांच्या राजवाड्यासमोरील मोकळ्या जागेंत, किंवा चिटणीस पार्कमध्ये भरलेल्या सभांतून, महात्मा भगवानदिन, पं. सुंदरलाल व अर्जुनलाल शेटी अशाच प्रकारें बोलत असल्याचें मी ऐकत होतों. पण पहिला युक्तिवाद मात्र थोडक्यांत निकालांत काढण्याजोगा नव्हता. महात्माजींनी स्वीकारलेल्या धोरणामुळे ढोंगीपणास ऊत येण्याचा संभव होता, पण तरी देखील ते त्याकडे दुर्लक्ष्य करण्यास तयार होते, असें दाखवून देऊन त्यांच्या सत्यासंबंधीच्या आग्रहाचा फोलपणा आपल्याला दिग्दर्शित करतां येईल, असें प्रथमतः मला वाटलें पण मी जों जों खोल विचार करूं लागलों, तों तों त्यांच्या या युक्तिवादांत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यागनिष्ठेचीं बीजें आहेत आणि सत्यनिष्ठेप्रमाणेंच ते त्यागनिष्ठेवरहि भर देतात, हें माझ्या निदर्शनास येऊं लागलें. मला माझ्या पूर्वीच्या मतांच्या बिनचूकपणाची शंका वाटूं लागली आणि प्रथमदर्शनीं नजरेस येईल त्यापेक्षाहि अधिक अर्थ त्या युक्तिवादांत आहे, असा माझा ग्रह झाला.

मला स्पष्ट आठवतें की, माझ्या राजकारणविषयक श्रद्धेच्या शुद्ध बौद्धिक बैठकीस गांधीजींच्या युक्तिवादाने सौम्य का होईना, पण धक्का दिल्याचा हा प्रथमच प्रसंग होता. विद्यार्थि-परिषदेच्या खुल्या अधिवेशनांत अनेक तासाच्या खडाजंगी-नंतर शालेय बहिष्काराचा ठराव मंजूर झाला, हें येथे सांगितलेंच पाहिजे, असें नाही !

बहिष्काराच्या ठरावाविरुद्ध मी करीत असलेल्या प्रचाराची माहिती गांधीजींना विद्यार्थ्यांकडून समजली की, जमनालालजींकडून समजली याविषयीं मला खात्री नाही. कदाचित् त्यांना ती दोघांकडूनहि कळली असेल.

नागपूर-कॉंग्रेसच्या वेळीं वृत्तपत्रांतून एक प्रकरण बरेंच गाजलें होतें, तें म्हटलें म्हणजे, कै. ना. खापर्डे व मी यांच्या सह्यांनिशी प्रसिद्ध झालेलें एक पत्रक होय. या पत्रकांत असहकाराच्या ठरावावर केवळ टीकाच आली नव्हती, तर यापूर्वी कॉंग्रेस ज्या मूलभूत तत्त्वांसाठी झगडत होती, त्यांना सर्वस्वी विसंगत असा हा ठराव असल्याचें दाखवून देण्यांत आलें होतें. प्रचलित नोकरशाहीचें सरकार उलथून पाडण्यासाठी लोकांचें 'प्रति सरकार' प्रस्थापित करणें यांत असहकारितेची तर्क दृष्ट्या परिणति होणार होती; उलटपक्षीं, कॉंग्रेसचें ध्येय प्रचलित नोकरशाहीच्या सरकारचें रूपांतर लोकराज्यांत होणें हें होतें. ही विचारसरणी या पत्रकांत मांडली होती. गांधीजींच्या धोरणाबद्दल खापर्डे यांच्याशीं माझी चर्चा व पत्रव्यवहार झाल्या-नंतर त्यांनी हें पत्रक लिहिलें होतें. माझ्या अजमासाप्रमाणे हें पत्रक गांधीजींच्या अवलोकनांत आल्यानंतरच त्यांनी माझे मित्र जमनालालजी यांजमार्फत निरोप पाठवून कॉंग्रेसनगर मधील आपल्या पर्णकुटींत भेटण्याचें निमंत्रण मला दिलें असावें. कॉंग्रेस-अधिवेशनाच्या एक दिवस आधीची ही गोष्ट असावी.

मी तेथे ठरलेल्या वेळेच्या कांही मिनिटें आधी गेलों, आणि माझ्या आगमनाची वर्दी महात्माजी व जमनालालजी यांस देण्यास महात्माजी पुर्णकुटीवरील स्वयंसेवकास सांगितलें. तो गेला व लौकरच बाहेर येऊन मला त्याने आंत जाण्यास सांगितलें. महात्माजी कोठें तरी बाहेर जाण्याच्या तयारींत होते व जमनालालजी त्यांजवळ उभे होते. मीं प्रथम जमनालालजींना नमस्कार केला व त्यांनी गांधीजींशीं माझा परिचय करून दिला. मी भारतीय पद्धतीप्रमाणें दोन्ही हात जोडून गांधीजींना अभिवादन केलें व त्यांनीं आपल्या नेहमींच्या स्मिताने त्याला जबाब दिला. ते म्हणाले, "श्रीयुत अणे, तुम्ही आलां, फार चांगलें झालें. पण दुर्दैवाने मी तुमच्याशीं आताच बोलणें करूं शकत नाहीं, कारण मला अन्यत्र महत्त्वाचें व निकडीचें काम आहे. पण झोपडीच्या दुसऱ्या भागात बसलेल्या मौलाना शौकतअलींशी तुम्ही बोलूं शकतां." गांधीजी व जमनालालजी मला शौकतअली मित्रांसमवेत बसले होते, तेथे घेऊन गेले. 'बडे भाई' यांच्या स्वाधीन मला केल्यानंतर गांधीजी जमना-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लालजींसह पर्णकुटीबाहेर पडले. सर्वस्वी अनपेक्षित परिस्थितींत येऊन पडल्यामुळे मी बराच गोंधळून गेलों! मौलानांशी चर्चा करण्याचा विचारहि मला शिवला नव्हता! तथापि त्यांनी माझें मन:पूर्वक स्वागत केलें व आपले प्रचंड बाहू माझ्या गळ्याभोवती टाकले! ती अक्षरश: एक 'राक्षस' (चांगल्या अर्थानें!) व 'वामन-मूर्ति' यांची भेट होती! हिंदु-मुसलमानांचें ऐक्य व वादातींत असे अनेक विषय यांवर आम्ही बोललों. तें बोलणें सर्वसाधारण स्वरूपाचें होतें व त्यावरून आम्ही कोणत्याच निर्णयाप्रत येऊन पोंचलों नाहीं!

पुन: केव्हा भेटावयाचें, हें न ठरवितांच गांधीजी गेले, यामुळे त्यांनी मला कशाला पाचारण केलें होतें, याबद्दल मी अजूनहि अज्ञानांतच आहें! मौलानांशी झालेल्या बातचितीवरून मी इतकाच निष्कर्ष काढतों की, बहुधा नवीन धोरणा-विरुद्ध माझे काय आक्षेप आहेत, ते ऐकून घ्यावे व माझें धोरण समजून घ्यावें अशी त्यांची इच्छा असावी. पण कोणत्या-ना-कोणत्या कारणाने काँग्रेस-अधिवेशन चालू असतां व त्यानंतरहि बराच काळ माझ्याशी पुन: भेटून बोलण्याचा दुसरा प्रसंग त्यांस आला नाहीं!

प्रथम भेटीचा सारांश एका वाक्यांत असा सांगतां येईल : मी त्यांच्या पर्ण-कुटीपर्यंत चालत गेलों खरा, पण त्यांच्याशी बोलणें मात्र होऊं शकलें नाहीं! पण ही भेट अगदींच निष्फळ झाल्याचें मी समजत नाहीं. आचार-विचार, उच्चार यांतील शुद्धतेचें तेज त्यांच्या नेत्रांत चमकतें आणि त्यांच्या सहवासांत अल्पकाळ आलेल्या प्रत्येकास त्यांजबद्दल दरारा व आदर वाटतो! मी त्यांची पर्णकुटी सोडली, ती मनावर त्यांची मन:पूर्वकता व मन:प्रसाद यांचा ठसा घेऊनच!

कोलंबो,
ता. ७-६-१९४६

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(२)

पुण्यश्लोक महात्मा गांधी

१. महात्मा गांधी यांचें व्यक्तिमत्व अपूर्व आहे. तें केवळ राष्ट्रपुरुष नाहीत, तर जागतिक विभूति आहेत. धर्म व अध्यात्म यांजकडे प्रवृत्ति असणारे लोक मानवजातीच्या कल्याणाचा संदेश देणारे व त्याप्रीत्यर्थ झटणारे चालू युगाचे सर्वश्रेष्ठ धर्मगुरु म्हणून त्यांजकडे पाहतात.

महात्माजींच्या चळवळी विविध असल्या, तथापि ज्या तत्त्वांचें त्यांनी प्रणयन केलें व जीं तत्त्वें मनुष्यजातीने समजून घेऊन अंगिकारावीं, असें त्यांस वाटत होतें, तीं संख्येने फार नव्हती. त्यांतील सारभूत तत्त्वें मी येथे देण्याचा प्रयत्न करतों.

नामदार माधव श्रीहरि अणे

गांधीजींच्या दृष्टीने ' सत्य ' हें केवळ आचरणाचा नियम नव्हता. त्यांच्या मताने त्याचें पुष्कळच अधिक महत्त्व होतें. ' सत्याचे प्रयोग ' या आपल्या आत्म-चरित्रांत ते म्हणतात, " माझ्या एकसारख्या अनुभवांवरून माझी खात्री झाली आहे की, सत्याव्यतिरिक्त दुसरा ईश्वर नाही ! " याप्रमाणे, सत्य हें त्यांस साधन वाटत नसून साध्य वाटत असे. सत्याने जगणें, सत्यासाठी जगणें व सत्यामध्ये जगणें हेंच जीविताचें परम कल्याण होय, अशी गांधीजींची शिकवण होती आणि त्यांनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जन्मभर तसेंच जगण्याचा प्रयत्न केला. सत्यरूप ईश्वराचा साक्षात्कार करून घेणें हें मानवाने साधावयाचें सर्वोच्च ध्येय होय. ते म्हणतात, "सत्य हें अवर्णनीय तेजाने झळकत असून आपणास नित्यदर्शन देणाऱ्या सूर्यापेक्षा त्याचें तेज अनंतपटीने प्रखर आहे. त्या महान् तेजाचा अत्यल्प अंश मात्र सूर्याच्या वाट्यास आला आहे!"- सत्यासंबंधींची कल्पना व्यक्त करतांना गीतेच्या विश्वरूपदर्शनाच्या अकराव्या अध्यायांत 'देवानां देव:' चें ज्या भाषेंत व ज्या प्रतिमेने वर्णन करण्यांत आलें आहे, ती भाषा व ती प्रतिमाच गांधीजींनी वापरली आहे:—

> दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता
> यदि भा: सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मन: ॥ —११. १२

देवांच्या तेजाचें वर्णन करतांना महाकाव्यें व पुराणें यांच्या कर्त्यांनी 'कोटि-सूर्यप्रभा' हा शब्दप्रयोग वारंवार वापरला आहे. गांधीजींच्या मतें देवाधिदेव व सत्य हीं एकरूप असल्यामुळे त्यांनी तीच भाषा उपयोगांत आणली आहे.

२. सत्यप्राप्तीचीं साधनें व पद्धति यांजविषयीं बोलतांना ते ठासून सांगतात, "सत्याचा साक्षात्कार होण्याचें अहिंसा हें एकमेव साधन होय." अन्यत्र ते म्हण-तात, "माझ्या सर्व प्रयोगांचा निष्कर्ष हा की, अहिंसेचें पूर्ण आचरण झाल्यानंतरच सत्याचें संपूर्ण दर्शन होऊं शकतें." गीतेंत वर्णिलेल्या समदर्शित्व व आत्मौपम्यबुद्धि या गुणांचा जसजसा विकास होईल, तसतशी अहिंसा अंगीं बाणूं लागेल. "क्षुद्रतम जीवावर जो स्वत:इतकें प्रेम करूं शकेल, त्यालाच अहिंसा साधूं शकेल"—असें गांधीजी म्हणतात. सत्याचा शोध करणाऱ्या प्रामाणिक जीवाने याच सोपान परंपरेने ध्येयशिखर गाठलें पाहिजे. कारण या सोपान परंपरेच्या अंतिम टोकालाच सत्यरूप ईश्वर आपल्या अति भव्य तेजाने झळकत उभा असतो! गीतेच्या सोळाव्या अध्यायांत पहिल्या तीन श्लोकांमध्ये या सोपान-परंपरेचें वर्णन आलें असून त्यांत ग्रथित केलेल्या गुणांस साकल्याने 'दैवी संपदा' असें म्हटलेलें आहे. हे गुण असे—

"अभय, शुद्ध सात्त्विक वृत्ति, ज्ञानयोग व्यवस्थिति, दातृत्व, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, सरळपणा, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांति, अपैशून्य, दया, अलोलुपत्व, मार्दव, विनय, वाईट कृत्याची लाज, अचापल म्हणजे निरर्थक व्यापारा-बद्दल औदासिन्य, तेजस्विता, क्षमा, धृति, शुचिर्भूतपणा, अद्रोह, अति मान नसणें."

गीता ज्या गुणसमुच्चयांस 'दैवी संपत्' म्हणते, तो गुणसमुच्चय गांधीजींच्या 'अहिंसाधर्म' या शब्द प्रयोगांत अंतर्भूत होतो, असें मला वाटतें. सत्याच्या शोधकाने पूर्णपणें आत्मशुद्धि केलेली असेल, तरच त्याचे पाय वरील सोपानपरंपरेवर टरूं शकतील. ते म्हणतात, "आत्मशुद्धीखेरीज अहिंसा पालन स्वप्नवत् होय!" कोणतेंहि धार्मिक, पुण्यप्रद व लोकोपकाराचें कार्य करूं पाहणाऱ्या माणसाचा 'आत्मशुद्धि' हा गुण आवश्यक होय, या गोष्टीवर संस्कारशास्त्रावरील सर्व प्रबंध आणि सर्व धर्मपर व नीतिपर ग्रंथ सारखाच भर देतात. स्वत:च्या व्यक्तिगत कल्याणाचें अगर समाजकल्याणाचें कार्य करूं इच्छिणाऱ्या माणसाने अंतर्बाह्य सूचिता अंगीं बाणविली पाहिजे. शुचित्व म्हणजे केवळ त्या व्यक्तीचें पावित्र्य नव्हे. सभोवतालचें अपवित्र वातावरण व्यक्तिगत शुचित्वाच्या देखील आड येतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणून त्या माणसाने वैयक्तिक पावित्र्यावर संतुष्ट न राहतां आपल्या आजूबाजूलाही पावित्र्य आणण्यास झटलें पाहिजे. सत्याच्या शोधकाने जनतेंत वावरून दरिद्री, भडाणी व पीडलेल्या लोकांची आपत्तींतून सुटका होऊन त्यांची परिस्थिति सुधारेल व उन्नति होईल, अशा प्रकारच्या कार्यास स्वतःस वाहून घेतलें पाहिजे- ही जी गांधीप्रणीत जीवित योजना आहे, तिचें हें माझ्या मतें प्रमुख समर्थनच ठरतें. सत्यशोधक किंवा सत्याग्रही यांनी समाजसेवा किंवा मानवहितपर चळवळी यांत नेहमी गुंग असावें, अशीच त्यांजविषयीं अपेक्षा असते. मासोळीने तलावाकडे धाव घ्यावी, तद्वत्, त्यांनी अंतःप्रेरणेनेच अशा कृत्यांकडे वळलें पाहिजे.

आचार-विचार-उच्चार यांत विकाररहित्य येण्यासाठी आणि प्रेम-द्वेष, आसक्ति-त्याग या द्वंद्वांपलीकडे जाण्यासाठी सत्योपासकाने संयमपूर्ण व शिस्तीचें आयुष्य घालविलें पाहिजे. व्यक्तीच्या स्वत्वाचा विकास होतां होतां तें विश्वव्यापी होणें ही केवळ बौद्धिक प्रक्रिया नाही. सर्वव्यापी सत्याच्या साक्षात्कारांत परिणति होईल-अशा रीतीने बौद्धिक दृष्टीच्या नित्य प्रसरणशील क्षितिजाबरोबर भावना व इच्छाशक्ति यांचा विकास व विशालीकरण करावें लागेल. जेव्हा स्वत्वाचा विसर पडून अहंकार उरणार नाही व 'अहं'ची विश्वाशीं समव्याप्ति होईल, तेव्हाच केवळ देहाशी निगडित असलेल्या व व्यक्तीत्वाच्या जाणिवेंतून उद्भूत होणाऱ्या इच्छा व आकांक्षा यांपासून त्या व्यक्तीचा आत्मा मुक्त होईल. अशा ज्ञानी व प्रगतिपर व्यक्तींचे अथवा सत्यशोधकाचे व्यापार ज्या व्यापक मानवजातीशी ते एकरूप व एकरस झाले, तिची सेवा करण्यापलीकडे निसळे असूंच शकत नाहीत. हे महान् आत्मे विश्वप्रेमाच्या सागरांत विरघळलेल्या लवणासारखेच म्हणावयाचे ! स्वतःबद्दल बोलतांना महात्मा गांधी म्हणतात, " मी स्वतःस शून्यवत् केलें पाहिजे. जोंपर्यंत मनुष्य आपण होऊन आपल्या बांधवामध्ये स्वतःकरता शेवटचें स्थान घेत नाही, तोंपर्यंत त्याला मुक्ति नाही ! अहिंसा हे नम्रतेचें अंतिम टोक होय !"

ज्याने आपल्या वासना जिंकल्या नाहीत व नम्रतेच्या अभ्यासाने स्वतःस शून्यवत केलें नाही, तो मोक्षास पात्र होत नाही, असें गांधीजीप्रमाणेंच ज्ञानेश्वरांपासून महीपतीपर्यंतचे सर्व भागवतधर्मी महाराष्ट्रीय संत सांगत आले आहेत. हेंच सत्य तुकाराम महाराजांनी आपल्या अमर अभंगवाणीने असें सांगितलें आहे:—

नीचपण बरवें देवा । न चले कोणाचाही हेवा ॥
महापुरें झाडें जाती । तेथे लव्हाळे राहाती ॥
येता सिंधूच्या लहरी । नम्र होतां जाती वरी ॥
तुका म्हणे कळ । पाय धरिल्या न चले बळ ॥

('निर्णय सागरी' प्रत, अभंग ८०७)

नम्रता व स्वत्वविसर्जन या अनुक्रमें प्रथम व अंतिम पायऱ्या असणाऱ्या सोपानास जे अनुसरले, त्यांनाच सत्यरूप ईश्वर साध्य आहे.

महाराष्ट्र-संतांतले पैठणचे एकनाथमहाराज यांचें चरित्र व शिकवणूक यांच्याशी गांधीजींनीं प्रतिपादिलेल्या तत्त्वांचें फार साम्य आहे. क्रोधवश होण्यास कारणें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असतांहि अपूर्व शांति, सहनशीलता व क्षमा दर्शविणाऱ्या प्रसंगांनी एकनाथांचें आयुष्य भरलेलें आहे. कविवर्य मोरोपंतांनी त्यांना ' शांतिजलधि ' म्हटलें, तें यथार्थच आहे. गुरु नानक व कबीर हे गांधीजीपूर्वीचे धर्मविषयक समावेशकता दर्शविणारे सत्पुरुष समजले पाहिजेत. गांधीजी नेहमी म्हणत, " माझा हिंदुधर्म सर्व धर्मांचा समावेश करणारा आहे. " गीतेसारखाच बायबल व कुराण यांबद्दल त्यांस आदर वाटे.

३. महर्षि व्यासांनी शाश्वत धर्माचें सार भागवतांत येणें प्रमाणें दिलें आहे:—

एतावान् अव्ययो धर्मः पुण्यश्लोकैरुपासिताः
यद्भूतशोकहर्षाभ्यां आत्मा शोचति-हृष्यति

दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी व सुखाने सुखी होणें हाच शाश्वत धर्म होय. हाच धर्म ' पुण्यश्लोक ' म्हणून जे अमर झाले, त्यांनी पाळला. पुण्यश्लोकांची नामावळी पुष्कळ धार्मिक हिंदु प्रातःस्मरणांत म्हणतात. नलराजा, युधिष्ठिर, विदेहराजा व श्री जनार्दन हे ते पुण्यश्लोक होत—

पुण्यश्लोको नलोराजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः
पुण्यश्लोको विदेहश्च पुण्यश्लोको जनार्दनः ॥

मला विश्वास आहे की, निकटच्या भविष्यकालांत पुण्यश्लोकांची नामावळी अद्यावत् होण्यासाठी प्रातःस्मरणिकेची नवी आवृत्ति काढणारा संपादक वरील चार नावांत गांधीजींचेंहि नांव अवश्य घालील. तो जास्तीचा श्लोक कांहींसा असा असेल:—

गांधीवंशसमुत्पन्नः पुण्यश्लोकश्च मोहनः
पुण्यश्लोकान् इमान् पंच प्रातःकाले सदा पठेत् ॥

गांधीजींनी आपल्या आत्मचरित्राच्या अखेर आपलें चित्त, शब्द व कृति यांत अहिंसा यावी, अशी प्रार्थना सत्यरूप ईश्वरास केली आहे. सत्याच्या या महान् उपासकाने आपल्या मागे एवढा वैभवशाली व बहुमोल आध्यात्मिक वारसा ठेवला आहे की, कृतज्ञ मानवजात त्यांचें सदैव पुण्यस्मरण करील व पृथ्वीवर होऊन गेलेले अहिंसेचे एक सर्वश्रेष्ठ प्रणेते म्हणून त्यांचा गौरव करील, असें म्हणावयास मला बिलकूल दिक्कत वाटत नाही !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केशवसुतांचा निसर्गविषयक रहस्यवाद*

केशव माधव आराधे, एम्. ए., काव्यतीर्थ.

● नागपुरचे तरुण लेखक रा. के. मा. आराधे यांनी प्रस्तुत लेख १९३७ मध्येच लिहून ठेवला होता, तो प्रसिद्ध होण्याचा योग आता येत आहे !

केशवसुतांवरील वाङ्मयांत या लेखाने महत्त्वाची भर पडत आहे.

★

पाश्चिमात्य वाङ्मयाच्या अध्ययनापासून मराठी वाङ्मयांतील नवयुगाला (renaissance) सुरुवात झाली, असें म्हणण्यास हरकत नाही. ह्या नवयुगाच्या लाटेंत तत्कालीन काव्यवाङ्मयालाहि वरीच कलाटणी मिळाली. मराठी काव्याच्या बहिरंगांत, तशीच, अंतरंगांतहि क्रांती घडून आली. आणि, इंग्रजी वाङ्मयांतील भावगीतादि नवीन काव्यप्रकारांप्रमाणे पुष्कळशा नवीन कल्पना आणि नवीन काव्याचे विषय मराठी कवींनी उचलले. त्यांतच निसर्गाकडे पाहण्याचा विशिष्ट दृष्टिकोनहि त्यांनी इंग्रजी कवींपासून घेतला. ह्याचा अर्थ, मराठी कवींत सृष्टिसौंदर्याविषयीं अभिरुची नव्हती, किंवा त्यांनी सृष्टिवर्णनें लिहिली नाहींत, असा नाहीं. अथवा, त्यांनी इंग्रजी निसर्गगीतांचें केवळ परवश अनुकरण केलें, असाहि नाही. त्यांनी पाश्चिमात्य कवींचा सृष्टीसंबंधी सहानुभूतीचा व सहवेदनेचा आत्मीय दृष्टिकोन उचलला, इतकेंच.

केशवसुतांनी मराठी कवितेचें जुनें वळण टाकून ज्याप्रमाणे अभिनव अशा इंग्रजी काव्यकल्पनांचा घडाडीने पुरस्कार केला, तशीच त्यांनी वर सांगितलेली सृष्टीसंबंधीचीं पाश्चिमात्य भावना पण आत्मसात् केली. आणि, ह्या विशिष्ट भावनेची व्यंजक अशी सृष्टिविषयक रचनाहि त्यांनी बरीच केली. ह्या रचनेचें त्यांच्या काव्यांत स्वतंत्र आणि वेगळें स्थान आहे, हें कोणीहि कबूल करील. त्यांच्या निसर्गगीतांत एकप्रकारची तीव्र उत्कटता आणि तळमळ दृष्टोत्पत्तीस येते. बालकवि सोडून दिले, तर त्यांच्याइतकी जिव्हाळ्याची सृष्टीविषयक कविता मराठी कवींत कोणीहि लिहिली नाही. ह्या बाबतींत इतर कोणत्याहि कवीहून त्यांचें मन अधिक संस्कारक्षम आणि ग्राहक होतें. अगदी सुरवातीपासूनच सृष्टीच्या दिव्यत्वाचा खोल ठसा त्यांच्या

* 'रहस्यवाद' हा गूढगुञ्जन (mysticism) ह्या अर्थी हिंदींत प्रयुक्त असलेला शब्द आहे. तो अधिक अन्वर्थक वाटल्यामुळे इथे वापरला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हृदयावर उमटला होता. बाह्यसृष्टींत जें एक शाश्वत आणि अगोचर सत्य अंतर्निहित आहे त्याचा ठाव घेण्याचा त्यांच्या अंतर्वेधिनी दृष्टीचा यत्न असे. सृष्टींतील वातचक्र, म्हातारी इत्यादि क्षुल्लक वस्तूंपासून तों थेट सूर्यताराादिकांपर्यंत त्यांच्या प्रतिभेचा अनिरुद्ध संचार होता. अगदी क्षुल्लक वस्तूंत देखील सौंदर्य पाहाण्याइतकी, दिव्यत्व शोधण्याइतकी त्यांची सहानुभूती व्यापक होती. त्यांच्या आत्मसापेक्ष दृष्टीला सृष्टींत पूर्णत्वाचा आदर्श भासला व सौंदर्याची परमावधि दिसली. आणि, तिच्यांतच त्यांनी अखेर 'सत्यं, शिवं, सुंदरं' अशा परमात्मतत्वाचा आविष्कार केला. ह्याप्रमाणे केशवसुतांच्या सृष्टिविषयक कवितेचें स्वरूप उदात्त आणि पृथगात्म आहे. आणि, ह्याच विशिष्ट भूमिकेवर त्यांच्या निसर्गविषयक रहस्यवादाची उभारणी झाली आहे. त्यांच्या ह्या निसर्गविषयक रहस्यवादाचें स्वरूप कळण्याकरिता निसर्ग–कवि ह्या नात्याने त्यांची भूमिका विषद करणें अवश्य आहे. ह्यांत त्यांनी निसर्गाचा कलावस्तु म्हणून कसा उपयोग करून घेतला, त्यांची निसर्गविषयक मनोवृत्ती कशी होती हेंच प्रामुख्याने पाहावयाचें-आहे.

कलेच्या इतर उपादानांप्रमाणे निसर्ग सुद्धा स्वयंपूर्ण कलावस्तु होऊं शकत नाही. कारण निसर्गाच्या यथातथ्य चित्रणांत कलेची पूर्णता नसून ती कलावंताच्या अंतरस्थ सौंदर्याच्या आदर्शांत, त्याच्या व्यक्तिगत निसर्ग-कल्पनेच्या अभिव्यंजनेंत असते. कलावंताच्या वैयक्तिक मनोभूमिकेप्रमाणे त्याचा निसर्गासंबंधी दृष्टिकोन बदलत असतो. केशवसुतांच्या कवितांतून देखील विशिष्ट भावनानुरंजित अशाच निसर्गाचें दर्शन आपणाला घडतें.

ही सृष्टीसंबंधी त्यांची भावना shairp[1] ने केलेल्या वर्गीकरणाप्रमाणे प्रमुखत: 'निसर्गाचा मानवसापेक्ष उपयोग' (Nature contrasted with man) ह्या प्रकारांत मोडूं शकेल. त्यांच्या सृष्टिविषयक काव्याचें वैशिष्ट्य व तदंतर्गत रहस्य-वादाचें मर्म त्यांच्या ह्या निसर्गविषयक आत्मसापेक्ष दृष्टिकोनांतच आहे, असें म्हण-ण्यास मुळीच प्रत्यवाय नाही. त्यांच्या मनोवृत्तीचा विशेष म्हणजे तिचा अंतर्मुख आणि तत्त्वप्रधान कल. ह्या विशेषामुळेच केवळ सृष्टीच्या बाह्यसौंदर्यावरच त्यांची दृष्टि स्थिरावत नसे. नैसर्गिक दृश्यामुळे जो एक तऱ्हेचा सहजस्फूर्त व भौतिक आनंद होतो, तो इंद्रियसुखाचाच एक प्रकार आहे. ह्या अवस्थेंत आत्मविस्मृतिजनक असे सुखकर संवेदन होतें. हिला सौंदर्यप्रतीतीची प्राथमिक अवस्था म्हणतां येईल. परंतु उच्च प्रतीच्या सौंदर्याचा जो हेतु मानसिक विकास तो ह्या अवस्थेंत सफल होत नाही. सौंदर्यप्रतीतीच्या उत्क्रांत अवस्थेंत मनुष्याची मननशील वृत्ति (Reflective mood) जागृत होत असते. ह्या अवस्थेंतील आनंद आध्यात्मिक स्वरूपाचा असून संयत असतो. आणि, म्हणूनच मनुष्याला आत्मविस्मृति न होतां स्वतःची ठळकपणें जाणीव राहाते. केशवसुतांच्या काव्यांत निसर्गविषयक सौंदर्यप्रतीतीची हीच उत्क्रांत भूमिका निदर्शनास येते. त्यांच्या स्वभावतःच मननशील व अंतर्मुख वृत्तीमुळे सौंदर्यप्रतीतीचा आनंद त्यांच्या बाबतींत केवळ इंद्रियनिविष्टच राहात नसे. त्यांच्या विस्मयाचें कारण आत्मसापेक्ष द्वैतानुभूति हेंच असे. ते स्वतःच्या आणि सृष्टीचा तुल-नात्मक विचार करीत. आणि, त्यांच्या दृष्टीने सृष्टि ही परिपूर्णतेचा आदर्श असल्याने त्यांना आपल्या अपूर्णतेची आणि वैगुण्याची जाणीव तीव्रतेने होई. त्यांच्या बहुतेक सृष्टिविषयक कवितांत ह्याचें प्रत्यंतर येतें.

---

1 'Poetic interpretation of Natuse'— By shairp.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परंतु केशवसुतांच्या काव्यांतून ह्या आत्मसापेक्ष भावनेलाच केवळ एकांगी महत्त्व दिलें नाही. निसर्गदर्शनाने होणाऱ्या मानवी अपूर्णतेच्या व वैगुण्याच्या जाणीवेबरोबर सृष्टीची सापेक्ष महत्ताहि त्यांना प्रतीत होई. ह्या परस्परपोषक दोन भावनांच्या समन्वयांतूनच त्यांचा निसर्गविषयक रहस्यवाद निर्माण झाला आहे.

केशवसुत हे एक रहस्यवादी कवि असल्याने ते निसर्गाकडे केवळ कलात्मक आणि मिथ्या भावनेने पाहात नसत. रहस्यवादाच्या मानसिक स्थितींत भावनेचा जिवंत जिव्हाळा असतो. म्हणूनच केशवसुतांच्या सृष्टिसंबंधी कल्पनेत एक प्रकारची आत्मीय भावनावशता दिसून येते. त्यांच्या जीवनाची ती मध्यवर्ती कल्पना होती. केशवसुतांचें सृष्टिविषयक काव्य केवळ अनुकरण आहे, असें मानणारे प्रो. मा. त्र्यं. पटवर्धन सुद्धा "ही भावना त्यांच्या जीवितास अत्यवश्य वाटत होती."—हें प्रांजलपणें कबूल करतात. निसर्गाविषयींची जिव्हाळ्याची ही भावना म्हणजे त्यांच्या रहस्यवादाची कोनशिला म्हटली पाहिजे. हिच्यावरच त्यांच्या निसर्गविषयक रहस्यवादाची भव्य इमारत स्थिर आहे. वरील भावनेचा त्यांच्या आत्मसापेक्ष भावनेशीं समांतर असा विकास होत जाऊन तिचें रूपांतर सृष्टिसंबंधी दिव्यत्वाच्या कल्पनेत झालें. त्यांची ही दिव्यत्वाची कल्पना सौंदर्यनिरपेक्ष नव्हती हें लक्षांत ठेविलें पाहिजे. त्यांची भूमिका प्रथम कलावंताची असल्याने निसर्गाचा सौंदर्यनिरपेक्ष दृष्टीने त्यांनी विचार करणें संभवत नाही. त्यांच्या निसर्गगीतांचे कला ह्या नात्याने महत्त्व ह्या सौंदर्याच्या कल्पनेवरच अवलंबून आहे.

निसर्गांतील सौंदर्याचें स्वरूप 'शाश्वत' व 'सत्य' आहे, असें त्यांचें मत होतें ('अढळ सौंदर्य')[1] ह्या सौंदर्याचें आध्यात्मिक विकासाला साह्य होतें, अशी त्यांची कल्पना होती ('दिवा आणि तारा'). त्यांच्या ह्याच सौंदर्यकल्पनेचा सर्वव्यापी विकास होऊन पलीकडे त्यांनी सृष्टींत अनंत व अज्ञेय अशा विश्वतत्त्वाची प्रतिष्ठा केली. सृष्टींतील सर्व वस्तूंत एका अलौकिक व सामान्यदृष्टीस अगम्य अशा तत्त्वाचें अस्तित्व आहे, असें त्यांना वाटे ('सृष्टि, तत्व आणि दिव्य दृष्टि'). निसर्गांतील ह्या 'अलौकिका'च्या प्रतीतीने त्यांना आध्यात्मिक अनुभव येत असे. 'क्षणांत नाहीसे होणारे दिव्यभास' दाखवून सृष्टि त्यांना आत्मसाक्षित्वाची जाणीव करुन देई. सृष्टिसौंदर्याच्या दर्शनाने पार्थिवतेचे बंध तुटून हृदय मुक्त झालें, म्हणजे हर्ष शोकातीत स्वसंवेद्य अशा आनंदाची जी अवस्था प्राप्त होते, तींत सान्त सृष्टींतील अनंतस्वरूपाचा, संपूर्णतेचा त्यांना अनुभव येई. ह्या उपाधिरहित तन्मयतेंतच मनुष्याला व्यक्ताव्यक्तांतील एकात्मतेच्या सौंदर्याची ओळख पटते, अशी त्यांची कल्पना होती ('झपूर्झा'). बाह्यत: जड आणि अचेतन भासणाऱ्या सृष्टींत त्यांना आत्म्याचें चैतन्य दिसलें. तिच्यांत विश्वांतील सर्व शिवत्वाचें व रम्यत्वाचें कारण असें महान् सत्य निविष्ट असून तेंच सर्वगत चिरंतन तत्त्व अशी त्यांची समजूत होती. आणि, शेवटीं

"जेथे ओढे वनराजी – वृत्ति रमे तेथे माझी
कारण कांहीं साक्ष तिथे – मज त्या श्रेयाची पटते"

('हरपलें श्रेय').

ह्यांत त्यांनी सृष्टींत श्रेयस्वरूप परमात्मतत्त्वाची साक्ष पटते, असें सांगून परमात्मतत्त्वाशीं सृष्टीचें ऐक्य कल्पिलें आहे. हीच त्यांच्या सृष्टिविषयक कल्पनेची चरम उत्क्रांति होय.

१ कंसांतील शब्द केशवसुतांच्या कवितांची शीर्षकें होत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केशवसुतांच्या निसर्गविषयक रहस्यवादाची थोडक्यांत ही अशी रूपरेषा आहे. 'निसर्गांतील अगोचर आणि दिव्य शक्तीची अनुभूति म्हणजे निसर्गविषयक रहस्यवाद' असें Mcdowall म्हणतो. [" An experience as may be called "Natural mysticism" meaning by, that a sense of something unseen, spiritual or supernatural in Nature--"]. महाराष्ट्रांतील प्रसिद्ध रहस्यवादी कवि रा. आ. रा. देशपांडे ह्यांनी निसर्ग-प्रतीतिधर्मीयांची[2] पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे. " निसर्गांतर्गत अशी जी एक जिवंत शक्ति आहे, तीच अंतिम 'एक' आहे अशी जाणीव झालेले. ह्या वृत्तीचे लोक निसर्गात रंगून गेलेले असतात, आणि निसर्गात्मतेंतून ते एकात्मतेशीं तादात्म्य पावतात. "[3] वरील व्याख्यांशी अनुरूप अशीच केशवसुतांची विचारसरणी आहे. त्यांची सुद्धा ही 'एकं सत्'-ची मनोवृत्ति देशपांडेनी सांगितल्याप्रमाणें 'निसर्गांतील विविधतेंत कांही तरी साधर्म्य, एकात्मता आहे, ह्या अंतस्फूर्त आणि अनुभवानें दृढ झालेल्या जाणिवेवर उभारली होती ' निसर्गांतील ह्या 'एका'चा कांही तरी अंश मनुष्यांतहि आहे, आणि दैवी अंशाच्या योगानें त्या 'एका'चें आकलन करून घेतां येईल' ही त्यांची कल्पना रहस्यवादाच्या कक्षेंत येतेच. " तर्काच्या पलीकडे असलेल्या सत्याचें आकलन आंतरप्रतीतीनें होते, अशी श्रद्धा असणारा " तो रहस्यवादी ह्या अर्थानेहि केशवसुत हे निसर्गविषयक रहस्यवादी होते, ह्या विधानाला प्रत्यवाय येत नाही.

केशवसुतांची उपरिनिर्दिष्ट विचारसरणी म्हणजे पद्धतशीर सृष्टिविषयक तत्त्वज्ञान नव्हे. तींत तत्त्वज्ञानाची सुसूत्रता आणि विश्लेषणपरता नाही. रहस्यवादांत चिकित्सेचा अभाव असून विश्वासाचें प्राबल्य असतें. आणि, तसें तें केशवसुतांच्या बाबतींतहि आढळल्यास नवल नाही. संशयापासून जाणिवेपर्यंत व जाणीवेपासून तादात्म्यापर्यंत रहस्यवादी मनोवृत्तीच्या विकासाच्या पायऱ्या आहेत. केशवसुतांच्या काव्यांतसुद्धा हा विकास स्पष्टपणें दिसून येतो.* हा सुसंगत असा मनोविकास व त्याला जबाबदार असलेली त्यांची स्वतंत्र आणि वेगळी मानसिक परिस्थिति लक्षांत घेतली म्हणजे 'केशवसुतांचें निसर्गकाव्य वर्ड्स्वर्थ, शेले-वगैरे इंग्रजी कवींचे विक्षिप्त अनुकरण आहे'—हा प्रो. पटवर्धनादि टीकाकारांचा आक्षेप किती व्यर्थ आहे, ह्याची कल्पना येईल.[4]

केशवसुतांच्या निसर्गविषयक रहस्यवादी विचारसरणीचें आतापर्यंत विवेचन केलें. आता तिचें सविस्तर परीक्षण करून तिची युक्तायुक्तता पाहणें जरूर आहे.

केशवसुत निसर्गाकडे केवळ कलात्मक दृष्टीनें पाहात नसत, हें वर आलेंच आहे. सृष्टीचा कलाकार ह्या नात्याखेरीज मनुष्याच्या जीवनाशी संबंध नाही, अशी त्यांची

---

२ 'प्रतीतिधर्म' हा आ. रा. देशपांडे ह्यांनी Mysticism ला सुचविलेला प्रतिशब्द होय.

३ प्रस्तावना – 'फुलवात'

४ ह्या विषयावर 'केशवसुतांचे सृष्टिविषयक काव्य व त्यांचा मनोविकास' हा "विविध विचार" ह्या पुस्तकांतील प्रस्तुत लेखकाचा निबंध पाहावा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समजूत नव्हती. ' निसर्गाविषयीं आत्मीय वृत्ति ' ही त्यांच्या तद्विषयक विचारसरणींतील मध्यवर्ती कल्पना होती. बाह्यसृष्टि आणि मनुष्याच्या अंतर्गत भावना यांत स्वभावतःच साहचर्य संबंध आहे, अशी त्यांची भावना होती. ही भावना मिथ्या आहे, अगर इंग्रजी कवींचें वेडें अनुकरण आहे, असें म्हणतां येत नाही. कारण आपल्या प्राचीन वाङ्मयांतहि ती आढळून येते. वेदांतील वाङ्मयांत निसर्गाच्या उपासनेचें उज्वल स्वरूप विद्यमान आहे. रवींद्रनाथांनी म्हटल्याप्रमाणें भारतीय संस्कृतीचा व साहित्याचा उगम तपोवनांत झाला होता. निसर्गाचा तत्कालीन आर्यांच्या जीवनाशीं अविच्छिन्न संबंध होता. सृष्टि ही त्याकाळीं देखील त्यांना आत्मीय वाटे. तिच्याशी त्यांचा संबंध सात्विक आणि प्रेममय असा होता. हा त्यांचा संबंध प्राणरक्षणापुरता अगर बाह्यसौंदर्यलिप्सेपुरताच मर्यादित नव्हता. ते सृष्टीला जड आणि अचेतन मानीत नसत. " यदिदं किञ्चगत् सर्वं प्राण एजति निःसृतम् "–अशी त्यांची भावना होती. ह्याला कारण " तदैक्षत एको ऽहं बहुस्यां प्रजायेय इति "–ह्या उपनिषत्वचनांत सांगितल्या-प्रमाणे त्यांनी सृष्टींत देखील आपणांत वास्तव्य करणाऱ्या ' एका 'चाच साक्षात्कार केला होता, हें होय. केशवसुतांच्या सृष्टिविषयक सहानुभूतीचें स्वरूप प्रथमतः इतकें स्पष्ट आणि व्यापक नसलें, तरी त्यांच्या विचारसरणीचें साकल्यानें अवलोकन करितां तिच्या मुळाशी हीच ऐक्यभावना असावी. निदान तिची परिणति तरी ह्याच कल्पनेंत झाली. केशवसुतांनासुद्धा सृष्टि निरात्म आणि अचेतन आहे, असें वाटत नव्हतें. ती तशी मानली, तर त्यांच्या निसर्गासंबंधी आत्मीय भावनेचा परिपोष आणि विकास होणें शक्य नाही. मानसशास्त्रानुसार केशवसुतांच्या ह्या आत्मीयतेच्या भावनेंत विसंगति नजरेस येत नाही. कारण सुसंस्कृत आणि भावनाप्रधान मनुष्याच्या निसर्गासंबंधीं दृष्टिकोन बहुशः आत्मीय सहानुभूतीचाच राहातो, अशी ग्वाही Hoffding ह्या मनोविज्ञानवेत्त्यानें दिली आहे.१

सामान्यतः कोणत्याहि रहस्यवादाची उभारणी चिकित्सेपेक्षा श्रद्धेच्या पायावरच असल्यानें त्याला एकतऱ्हेनें धार्मिक स्वरूप आलें असतें. धर्म म्हणजे केवळ तत्वसंहति नव्हे, किंवा सत्याची प्रतिष्ठापनाही नव्हे. विशिष्ट श्रद्धेवर व भावनेवर जीवनांत संगति निर्माण करून परमात्मतत्वाशीं मानवात्म्याचा संयोग घडवून आणणें हे धर्माचें साध्य ह्या दृष्टीनें केशवसुतांच्या विचारसरणीची सृष्टीचे परमात्मतत्वाशीं अभिन्नत्व कल्पून ह्या ' तत्वाशीं ' आत्मैक्य प्रतीत होण्याइतकी परिणति पाहिली म्हणजे त्यांच्या निसर्गविषयक रहस्यवादाला तात्विकदृष्ट्या तरी धार्मिक स्वरूप कसें प्राप्त झालें हें स्पष्ट होईल. हें धार्मिक स्वरूप कांही टीकाकार समजतात त्याप्रमाणें, केवळ योतांड अगर लोकांच्या वंचनेकरिता केलेला बुद्धिपुरःसर प्रयत्न नसून संस्कारक्षम हृदयाचा निसर्गाशीं संबंध आला असतां त्याची सहजप्राप्त आणि स्वाभाविक उत्क्रांति होय. कांही अंशीं प्राचीन आर्यांच्या निसर्गोपासनेला निसर्गविषयक रहस्यवाद म्हटल्यास हरकत नाही. ह्या निसर्गोपासनेची मानसशास्त्रदृष्ट्या कशी उत्क्रांति झाली, हें पाहिले असतां सृष्टिविषयक रहस्यवादाची भूमिका स्पष्ट होईल.

निसर्गाशीं मनुष्याचा संबंध आला, म्हणजे ' हा मी, आणि माझ्याहून वेगळा हा निसर्ग ' अशी द्वैतानुभूति प्रथम प्रतीत होते. ह्या नंतरची स्थिती म्हणजे ह्या द्वैतानुभूतिमुळे कुतूहल वाटून निसर्गाच्या निकट अवलोकनानें येणारा नाविन्याचा

१ Hoffding—' Outlines of Psychology '—pp. 266.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुभव. नाविन्याला मुग्ध होऊन मनुष्यांत विस्मयाची भावना निर्माण होते. ह्या विस्मयोद्रेकाच्या मुळाशी निसर्गाची अप्रतिहत सत्ताहि असते. आणि; ह्या जाणिवेंतून भीतीचा उगम होऊन त्या सत्तेच्या अनुकूलतेकरिता तिचें उपासनेंत परिवर्तन होतें. उपासनेची पुढची पायरी म्हणजे भक्ति आणि आनंद. आणि, सर्व धार्मिक भावनांच्या मुळाशी ह्याच भक्ति, आनंद आणि विस्मयाच्या वृत्ति असतात, असें शास्त्रज्ञांचें मत आहे. ह्या धार्मिक भावनांनीच मनुष्याचा निसर्गांतील अतींद्रिय सत्तेवरील विश्वास जागृत होतो आणि निसर्गांतील प्रत्येक पदार्थांत त्याला 'अनंततत्वाचे' आणि 'संपूर्णतेचें' सौंदर्य दिसूं लागतें. "धर्मच विश्वास आणि कल्पनेच्या द्वारें निसर्गसौंदर्यांतील अनंतस्वरूप अनुभवगम्य करून देतो"—असें पर्सी ब्राउनने म्हटलें आहे. केशवसुतांच्या निसर्गविषयक रहस्यवादाची प्रवृत्ति एक-प्रकारें धार्मिकच आहे, हें आपण पाहिलेंच. त्यामुळे त्यांच्या निसर्गविषयक कल्पनांतून व्यक्त झालेली ही अनंताची आकांक्षा व 'अमर्यादा'करितां तळमळ ('हरपलें श्रेय') स्वाभाविक वाटूं लागते. शिवाय सृष्टिविषयक कोणत्याहि ध्येयवादी विचारसरणीची परिणति अखेर ह्या असीम आणि अनंत सत्तेवरील विश्वासांतच होत असते. स्वतः सृष्टीच्या अमर्याद स्वरूपांत ह्या सत्तेवरील विश्वासाचीं बीजें आहेत. "It always suggests the Absolute. It is a great shadow pointing to the sun behind it,"[१] असे Emerson ने निसर्गाविषयीं म्हटलें आहे. सारांश, केशवसुतांच्या काव्यामधला हा 'अमर्यादा'वरील विश्वास आणि त्याच्या प्राप्तीकरता व्यक्त झालेली त्यांची तळमळ ही केवळ वंचना नव्हे, अथवा पाश्चिमात्य कवींपासून उचलेला काव्यसंकेतहि नव्हे. कलेच्या उदात्त भूमिकेला अनुसरूनच झालेली निसर्गकल्पनेची ही स्वाभाविक उत्क्रांति होय. कलेच्या उदात्त आणि सात्विक स्वरूपांत प्रत्येक वस्तु ही अनंताचें प्रतिबिंब भासते, असा कार्लाइलने निर्वाळा दिला आहे.

येथवर केशवसुतांच्या निसर्गविषयक रहस्यवादाचें समालोचन व त्याची सर्व-सामान्य युक्तता पाहिली. आता त्याला कारणीभूत असलेल्या मानसिक परिस्थितीचा विचार करून हें विवेचन आटोपतें घेऊं.

दृश्य प्रकृतीसंबंधींचीं द्वैतभावना हा कविमनाचा विशेष होय, असें Herbert Read[२] नें म्हटलें आहे, तें केशवसुतांना त्यांच्या निसर्ग काव्याच्या बाबतींत पूर्णपणें लागू होतें. त्यांची सृष्टिसंबंधी आत्मसापेक्ष भावना ह्याच विशेषाची निदर्शक आहे. सृष्टीचा सापेक्ष स्वरूपाचा त्यांच्या मनावर जो परिणाम होत असे, त्याला कारण ही त्यांच्या मनोवृत्तींतील द्वैतभावना. निसर्गाचा हा सापेक्ष स्वरूपाचा परिणाम स्वाभाविक व मानसशास्त्राला अनुसरून असल्याचें Collingwood[३] म्हणतो. आपल्या अपूर्णतेच्या जाणिवेने केशवसुतांना सृष्टि परिपूर्णतेचा आदर्श वाटली, ती ह्यामुळेच.

त्यांच्या रहस्यवादाची मानसिक उपपत्ति सर्वसामान्य वाङ्मयीन रहस्यवादाच्या कक्षेत येण्यासारखी आहे. "आत्मप्रदर्शन (Self-display) व जिज्ञासा

1 'Nature' (Miscellanies)—R. W. Emerson.
2 'Wordsworth -Herbert Read.
3 'Nature presents herself in different forms corelative to the aspect of observer's own life'—"Outlines of a Philosophy of Art"-By R. G. Collingwood,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(Curiosity) या दोन ' सहजप्रवृत्ती ' च्या (Instinct) संमिश्र ' उन्नयन ' (Sublimation) नामक प्रक्रियेने वाङ्मयीन गूढवादाचा संभव होतो ", असे रा. वा. ना. देशपांडे ' निवेदना ' ला लिहिलेल्या प्रस्तावनेंत म्हणतात. त्यांची उपपत्ति मला मान्य आहे. ह्या विषयाचें विवेचन सविस्तरपणें स्थलाभावामुळें करणें शक्य नाही. ह्या बाबतींत वा. ना. देशपांडे ह्यांची उपरिनिर्दिष्ट प्रस्तावना अवश्य वाचावी. त्यांनी निर्दिष्ट केलेल्या मानसिक प्रक्रियेबरोबरच कलावंतांना सामान्य अशा व केशवसुतांच्या बाबतींत विशेषेंकरून निर्देशनीय अशा 'वास्तवविमुखते'चा (Antism)[1] उल्लेख केला पाहिजे. प्रत्येक कलावंत मानवी जीवितांतील अपूर्णतेच्या परिहारार्थ कलेची काल्पनिक सृष्टि निर्माण करीत असतो. ' All Art is a poverty-certificate given to life ' असें Pfister म्हणतो. आणि म्हणूनच ' वास्तवविमुख ' मनोवृत्ति कलावंताच्या बाबतींत स्वाभाविक वाटूं लागते. मानवी जीवितांतील वैगुण्याची जाणीव होऊन सृष्टींत अलौकिकाचा आविष्कार करणें आणि त्या अलौकिकाशीं एकात्म होण्याची तळमळ निर्माण होणें हा ' वास्तवविमुखते 'चाच परिणाम होय. ह्या दृष्टीने केशवसुतांच्या रहस्यवादी विचारसरणीला (mysticism) ही वास्तवविमुखताच कारणीभूत आहे. Pfister ने आपल्या ' Expressionism in Art ' (कलेंतील अभिव्यंजनावाद) ह्या ग्रंथांत रहस्यवाद हा वास्तवविमुखतेंतून कसा उद्भूत होतो, त्याचें सविस्तर विवेचन केलें आहे. पण हा स्वतंत्रच विषय असल्यामुळे त्याचा नुसता निर्देश करून पुढे वळणें बरें. प्रो. मा. त्र्यं. पटवर्धन ह्यांना केशवसुतांच्या सायुज्यवादांत (mysticism) जें ' दुर्दम्य आत्ममाहात्म्यकथन ' व ' विश्वव्यापी अत्युक्ति ' आढळली, तिचीहि उपपत्ति सहज लागण्यासारखी आहे. केशवसुतांचें आत्ममाहात्म्यकथन मनोविश्लेषणशास्त्रांतील ' आत्ममाहात्म्यवादा-(magalomania) शीं सदृश दिसतें. हें सादृश्य अर्थात् मर्यादित स्वरूपाचेंच आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. वरील आत्ममाहात्म्यवादी मनोवृत्ति ' वास्तवविमुखते ' चाच परिणाम होय असें Pfister ह्या मनोविश्लेषणशास्त्रज्ञाने म्हटलें आहे. अस्तु.

येथपर्यंत केशवसुतांच्या निसर्गविषयक रहस्यवादाचें समीक्षण आणि शक्यतोंवर समर्थन केलें. सध्या केशवसुतांच्या काव्यावरील प्रतिक्रियात्मक टीकेला सुरुवात झाली आहे.[2] विशेषतः; त्यांच्या निसर्गकाव्यावर ' वर्डस्वर्थ, शेले-इत्यादि कवींच्या कांही कविता वाचून सृष्टिसंबंधी त्यांची जी ' भ्रमजन्य ' व ' विक्षिप्त ' कल्पना झाली तीवर त्यांच्या निसर्गविषयक रहस्यवादाचा डोलारा उभारला आहे ', असा आक्षेप करण्यांत येतो. केशवसुतांच्या सृष्टिविषयक काव्याचें व तदंतर्गत रहस्यवादाचें खरें स्वरूप व त्यांतील संगति निदर्शनास आणावी, हाच वरील सर्व विवेचनांत प्रस्तुत लेखकाचा हेतु आहे.

---

१ मनोविश्लेषणशास्त्रांत (Psycho-Analysis) त Antism ची व्याख्या पुढीलप्रमाणें केली आहे:—" It is an active turning away from the external world and living within the inner world of fancy "

२ ' आधुनिक मराठी वाङ्मयसेवक, भाग १ ' ह्या पुस्तकांतील प्रो. मा. त्र्यं. पटवर्धनांचा केशवसुतावरील निबंध पहावा.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाटक आणि प्रेक्षक

द. रा. गोमकाळे
एम्. ए., एल्एल्. बी.

● ब्रह्मपुरीचे रा. गोमकाळे यांनी 'नाटककार कोल्हटकर' या नांवाचा वाचनीय प्रबंध लिहिलेला आहे. त्यांतील एक स्वयंपूर्ण भाग येथे देण्यांत येत आहे.

*

प्रेक्षक प्रेक्षणापलीकडे बाह्यत: दुसरें कांहीच काम करतांना दिसत नसला, तरी त्याची सत्ता मात्र एखाद्या चक्रवर्ति महाराजाप्रमाणे या सर्व क्षेत्रावर चालत असते. प्रेक्षक निरनिराळ्या स्वभावाचा, प्रकृतीचा, आवडी-निवडीचा असतो आबालवृद्ध त्यांत समाविष्ट असतात. त्यांच्या आवडी-निवडी सारख्या बदलत असतात. अपेक्षा सारख्या वाढत असतात. अशावेळीं कोणत्या प्रकारचा, कोणत्या विशिष्ट गुणांचा व दर्जाचा तो असावा, अशी अपेक्षाहि करणें कठीण. त्यामुळेच सर वॉल्टर स्कॉट, जॉर्ज जीन नॅथन आदि पाश्चिमात्य टीकाकार प्रेक्षकांना संतुष्ट करण्यांत आनंद मानण्याइतकें प्रेक्षकांचें महत्त्व नाही, असें प्रतिपादतात. परंतु हें तितकेंसें बरोबर नाही. नाटक आणि प्रेक्षक यांचे संबंध अत्यंत गुंतागुंतीचे आहेत. त्याची सहजा सहजीं उकल करून दाखवितां येणें शक्य नाही.

इब्सेन संबंधीं बोलतांना बॅरेल एच्. क्लार्क म्हणतो, प्रेक्षकांना आपल्या मताचे बनविण्यापेक्षा त्यांच्या भावनेला हात घालून त्यांना कार्यप्रवृत्त करण्यांतच आपलें कौशल्य खर्चावें, असें त्याला वाटत असे. वाईट अभिरुचीच्या प्रेक्षकांमुळे वाईट नाटकें पुढे येतात व वाईट नाटकांमुळे प्रेक्षकांची अभिरुचि बिघडते, हेंहि अनुभवाने पटलेलें सत्य आहे. अर्थात् नाटक आणि प्रेक्षक यांचा उपेक्षा करण्या-सारखा संबंध खास नाही.

एलिझाबेथ ड्र्यू म्हणते, कवि किंवा चित्रकार आपली कलाकृति निर्माण करतांना रसिकांना विसरूं शकतात. कारण, त्यांची कलाकृति ते स्वत:च निर्माण करीत असतात. त्यांना पाहिजे त्या निवडक रसिकांनी त्यांच्या कृतीचें कौतुक केलें असतांहि त्यांचें समाधान होऊं शकतें. पण नाटककाराचें तसें नाही. रंगभूमीच्या द्वारां आपल्या विशिष्ट दृष्टिकोनांतून त्याने निर्माण केलेलें मानवी जीवनाचें चित्र दाखविणारा तो कलावन्त आहे. त्यामुळे आपल्या या समाज जीवनाच्या रंगभूमीवरील चित्रामुळे लोक संतुष्ट व्हावे, ही त्याची इच्छा असते.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ॲ. निकोल तर यापुढे जातो. तो म्हणतो, नाटकाचें स्वरूप आणि त्यांतील विवेचन या गोष्टी सरतेशेवटी ज्या प्रेक्षकांसमोर नाट्यप्रयोग व्हावयाचा, त्या प्रेक्षकां-वर अवलंबून असतात. नाटकाच्या क्षेत्रांत आमूलाग्र स्वतंत्र अशा बुद्धिचातुर्यापेक्षा तत्कालीन एकंदर सामाजिक वातावरणालाच जास्त महत्व असतें. नाटकाला लागू असणारे कायदे त्याच्या चाहत्या वर्गानेच करावयाचे, हा सिद्धांत बहुश: कधीच मोडला जात नाही.

Drama's laws the drama's patron gives
For we all that live to please, must please to live ड्रायडन

ॲसले ड्यूक्स या ग्रंथकाराने देखील याबाबत अतिशय महत्वाचे असे विचार व्यक्त केले आहेत. तो म्हणतो, नाटक जेव्हा बहुजन समाजापेक्षा शोकी, सुशिक्षित अथवा बुद्धिमान् लोकांनाच जास्त रंजित करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा त्याचें महत्व कांही प्रमाणांत नष्ट होतें, हें नक्की. नाटकाचा उत्कर्ष व्हावयाचा असेल, तर त्याने बहुजनसमाजाच्या भावनांशी व आवडीशी समरस व्हावयास पाहिजे. याचा अर्थ असा नव्हे की, आपली स्तुति व्हावी, म्हणून नाटककाराने वर्तमानपत्रकारांचे पाय धरावे, किंवा क्षणकाल प्रसृत होणाऱ्या मताचा त्याने प्रचार करावा. परंतु नाटक पाहून बहुजनसमाजाला आपल्या आवडी निवडी व भावना यांवर नाटककाराचा निष्ठायुक्त विश्वास आहे, अविश्वास नाही, असें दिसलें पाहिजे. नाटक आणि प्रेक्षक यांचे परस्परसंबंध कधीहि न तुटण्यासारखे आहेत. ज्या रंगभूमीबद्दल प्रेक्षकांच्या मनांत अप्रीति निर्माण झाली असेल, त्या रंगभूमीवर सर्वोत्कृष्ट नाट्यकलाकृति कधीहि निर्माण होऊं शकणार नाही. ज्या रंगभूमीबद्दल असीम आदर आहे, आणि समाजाने तिची जोपासना केली आहे, अशा रंगभूमीवर त्याचा मोबदला उत्कृष्ट कलाकृतींच्या द्वारें दिसावयाचाच.

सारांश, प्रेक्षक हा एकापरीने नाट्य प्रयोगावर आपल्या केवळ उपस्थितीने सत्ता गाजविणारा सार्वभौम राजा आहे. पण तो सार्वभौम अनियंत्रित नाही. इंग्रजी राजाप्रमाणे एका प्रकारें तो घटनेने बद्ध असा राजा आहे. त्यावर सत्ता विधिमंडळाची आहे; आणि त्या विधिमंडळाचा नायक मुख्य प्रधान आहे. नाटकाच्या राज्यांत हें स्थान प्रथितयश आणि नवनवोन्मेषशाली अशी प्रतिभाशक्ति ज्याच्याजवळ आहे, त्यालाच प्राप्त होत असते. पण असा कोणी जबर नेता उरला नाही, म्हणजे प्रेक्षक हाच एक सर्व सत्ताधीश होऊन बसतो.

नाटक रंगभूमीवर प्रेक्षकासमोर दाखविलें जातें. प्रेक्षक रंजनाने वश होऊं शकतात. प्रेक्षकांसमोर जी कथा प्रयोग-रूपाने सांगावयाची, त्यांतून जें तत्व प्रतिपादन करावयाचें तें देखील रंजन करून. कांही प्रमाणांत प्रेक्षकांच्या आवडीनिवडीशी समरस होऊन— त्यांच्या सारखें होऊन— त्यांना विश्वासांत घेऊन— जणू कांही प्रेक्षक हा मालक असून नाटककार हा त्याचा गुलाम आहे, आणि या गुलामाचें जीवन मालकाचा अनुनय करण्यांतच साठलेलें आहे. नाटककाराला शिक्षक मानवयाचें असलें, तरी रंजन— अनुनय याच मार्गाने त्याला आपल्या शिष्याला एक एक गोष्ट शिकवावी लागेल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अर्थात्‌च ज्यामुळे प्रेक्षक मूळांतच बिथरून जाईल, अशी कोणतीहि गोष्ट नाटककाराला करतां येणार नाही. म्हणूनच नाटककार हातीं छडी घेऊन समाजाचा शिक्षक होऊं शकत नाही. प्रचाराच्या कामीं नाटकांचा उपयोग करणारांना देखील रंजनाच्या द्वारेंच समाजाला शिकवण द्यावयाची असते. म्हणूनच बहुजनसमाजाला रुचणार नाही, अशा गोष्टींचा प्रचार नाटकांतून उघड करणें धोक्याचें आहे. आपल्याला अनुकूल अशी समाज परिस्थिति सामान्यतः नाटककार निर्माण करूं शकत नाही. पण अशी अनुकूल परिस्थिति निर्माण झाली, तर तिचा भरपूर उपयोग मात्र तो करून घेऊं शकतो. वर निर्दिष्ट केलेले सिद्धांत उदाहरणाने आपल्याला अधिक स्पष्ट करतां येईल.

आपण इब्सेनच्या Doll's House 'घरकुल'चें उदाहरण घेऊं. या नाटकांत इब्सेनने आपल्या घरादाराला, मुलाबाळाला सोडून आपल्या पतीचें घर टाकून जाणारी क्रांतिकारक अशी स्त्री-नायिका निर्माण केली आहे. नोराच्या निर्मितीने पाश्चिमात्य समाजांत त्यावेळीं अतिशय खळबळ उडवून दिली होती, असें तत्कालीन इतिहासावरून दिसतें. कांहींना नोराचा हा गृहत्याग बरा न वाटल्यामुळे त्या नाटकाचें रूपांतर करतांना 'घराबाहेर' मधील निर्मलेप्रमाणे मातेचें कर्तव्य पार पाडण्याकरिता ती आपल्या अजाण अर्भकांकरितां परत येते, असें दाखविल्याचें इब्सेनच्या चरित्रांतील उल्लेखावरून दिसतें. आपल्या कलाकृतींत इतरांनी असा बदल करण्यापेक्षा आपणच तो केलेला बरा असें वाटून जर्मनींतील प्रेक्षकांच्या सोईकरितां स्वतः इब्सेनलाच अशा तऱ्हेचा फरक करून द्यावा लागला.

'मी आनंदी होतें. सुखी नव्हतें, असें आपल्या पतीला स्पष्ट सांगणारी नोरा इब्सेनने कशी निर्माण केली ? समाजाला जबरदस्त धक्का देणारा हा तिचा शेवटचा प्रवेश क्षणभर विसरूं आणि त्या पूर्वीचे नोराचें चरित्र आपण पाहूं. आपल्याला काय दिसतें ? अत्यंत आनंदी, खेळाडू, पतिपरायण पति-पुत्रांच्या सुखापुढे आपलें स्वतःचें सुख तुच्छ लेखणारी, अत्यंत प्रेमळ अशी आदर्श पत्नी त्यांत आपल्याला दिसते ना ? अशी सहचारिणी आपल्याला लाभली, तर आपण सुखाच्या शिखरावर राहूं, असें कुणालाहि वाटतें ना ! या पात्रासंबंधीं आपल्या मनांत अत्यंत प्रेम, आदर, जिव्हाळा उत्पन्न होतो ना ? अशा अत्यंत प्रेमळ स्त्रीचा आपल्या प्रतिष्ठेसाठी तिचा नवरा हृदयभेदक असा विरोध करतो—मग नोरा तरी काय करणार ? असल्या माणसाच्या सहवासांत कोणती स्त्री राहावयास तयार होईल, असें त्यामुळे आपल्याला वाटतेंच—सारांश, नोराच्या जीवनांतील हा क्रांतिकारक शेवट करण्यापूर्वी इब्सेनने प्रेक्षकांचा बेमालूम अनुनय केला, रंजन केलें. त्यांना विश्वासांत घेतलें.

दुसऱ्या सिद्धांताच्या स्पष्टीकरणार्थ आपण खाडिलकरांच्या 'भाऊबंदकी', 'कीचकवध', 'कांचनगडची मोहना' आदि नाटकांचें उदाहरण घेऊं. विसाव्या शतकांतील पहिल्या दशकांतील राजकीय वातावरण नजरेसमोर आणा. हें कार्य वीर सावरकर आदि क्रांतिकारकांनी, लोकमान्य टिळकांसारख्या जहाल पुढाऱ्यांनी आणि कर्झनसारख्या अधिकाऱ्यांनी केलें. ही राजकीय जागृति आणि प्रक्षोभ निर्माण करण्याचें सामर्थ्यवान् कार्य राजकीय पुढाऱ्यांनी केलें. पण ही परिस्थिति निर्माण होतांच त्या परिस्थितीचा पुरेपूर फायदा मात्र खाडिलकरांनी घेतला. स्वदेशाभिमानाने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ओतप्रोत भरलेलीं, परकीयासंबंधी असंतोष फैलावणारीं अशीं त्यांचीं नाटकें रंजनाचें तंत्र सांभाळून आणि कलात्मक अविष्कारानेच पुढे आलीं असतांहि सरकारच्या नजरेवर आलीं आणि 'कीचकवधा'ला बंदी झाली. 'कीचक वध', 'भाऊबंदकी' यांत प्रेक्षकांचें रंजन आहे, अनुनय आहे, पण परिणाम मात्र प्रक्षोभक आहे.

प्रेक्षक-वर्ग आणि त्याची अभिरुचि ही एखाद्या निर्जीव वस्तूप्रमाणें निश्चल नाही. त्यामुळे विद्यमानसमाजाला कोणतें नाटक आवडेल हे निश्चयाने सांगता येणे कठीण आहे. जनमत आज अनेक मार्गांनी तयार केलें जातें. वर्तमानपत्रें, दूरध्वनिक्षेपक जाहिराती इ॰ आधुनिक साधनें सर्वांना परीचित आहेतच. या साधनांच्या द्वारां बहुजनसमाजाचें मत आधीच दूषित केलें जातें. दिवसभऱ्याच्या कष्टाने कंटाळलेल्या प्रेक्षकांनी या तरी खऱ्याखोट्याचा निवाडा करुन घेण्याचें आणखी कंटाळवाणें काम का करावें ? त्यामुळे या प्रचाराचा साहजिकच त्यांच्यावर परिणाम होतो. कित्येकदा नाटकापेक्षा त्या नाटकांत काम करणाऱ्या नटनटींच्या नांवावरच तो इतका भाळलेला असतो कीं, त्याला अन्य गोष्टीकडे लक्ष देण्याची जरूर देखील वाटत नाही. आणि, अशा विचित्र व विशिष्ट परिस्थितींत नाटकाची वास्तविक योग्यता पडताळून पाहण्याचें कामहि त्यांच्याकडून होऊं शकत नाही.

नाटकांची प्रयोगक्षमता पडताळून पाहण्याच्या मार्गांत नाट्यव्यावसायिकांचीहि मोठी धोंड असते. एखादें नवीन नाटक धंदेवाइकांपुढे ठेवा की, त्यांच्या मनाची द्विधास्थिति झालीच म्हणून समजा. नाटक तर चांगलें आहे, पण त्याला पैसा मिळेल किंवा नाही ? या शंका-कुशंकांच्या द्वंद्वांत चांगलेंहि नाटक नक्की प्रयोगाकरिता घेतलें जात नाही; आणि नाटक प्रयोगक्षम असलें, तर अन्य मार्गांने त्या नाटकाला हजारों अडचणींचे डोंगर ओलांडून आपलें महत्त्व सिद्ध करावें लागतें. नाटकाचा धंदा करणाऱ्या व्यक्तींच्या पुढे पैसा मिळेल किंवा नाही, हाच प्रश्न प्रामुख्याने असतो. नाटकाच्या चांगल्या-वाईट गुणांकडे पाहण्याचा प्रश्नहि त्यांच्यापुढे येत नाही.

उदाहरणच द्यावयाचें झाल्यास अत्र्यांच्या 'घराबाहेर' नाटकाचें देतां येईल. तें नाटक बालगंधर्वांना आवडलें होतें. परंतु त्यांच्या मनाला नाटकांतील नांवात सनातनी हिंदुमनाला अशुभ वाटेल, अशी छटा दिसली आणि गंधर्वांनी तें रंगभूमीवर आणलें नाही. अत्र्यांच्या 'घराबाहेर' व 'उद्याचा संसार' या नाटकांचे प्रयोग गंधर्व किंवा ललितकलादर्श नाटक मंडळ्यांनी केले असते, तर अत्र्यांच्या प्रतिभेचा अधिक सुंदर विकास झाला असता, असें खांडेकर म्हणतात, नव्या कालाची जाणीव उत्कर्षाप्रत पोहोंचलेल्या या नाटकमंडळ्यांना नव्हती, असें जें त्यांचें म्हणणें आहे, तें अगदी खरें वाटतें.

यावरून नाटकाचें यशापयश व गुण हे सर्वस्वी प्रेक्षकांच्या आवडी-निवडी व अभिरुचि यांच्यावरच अवलंबून आहेत, असें म्हणतां येईल का ? 'नाही' हें त्याचें उत्तर आपण मागे दिलेंच आहे. प्रतिभाशाली नाटककार प्रेक्षकांना प्रयत्नाने वळवून घेतोच आणि आपल्याला पाहिजे तशी उच्च प्रकारची अभिरुचि तो त्यांच्यांत निर्माण करतो. शेक्स्पीयर, इब्सेन हीं पाश्चात्य उदाहरणें तर जाऊंच द्या, पण आपल्या रंगभूमीवरील काकासाहेब खाडिलकर यांचें उदाहरण ताजें आहे. एका बाजूने संगीत नाटकांची लोकप्रियता ऐन भरांत असतां त्यांनी आपलीं गद्य नाटकें मराठी रंगभूमीवर गाजविलींच व प्रेक्षकांनीहि त्यांचें आत्मीयतेने स्वागत केलें. पण हें भाग्य सामान्य नाटककारांचें नव्हे. सामान्य नाटककाराला प्रेक्षकांचा अनुनय करूनच यश मिळवावें लागेल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रतिभाशाली नाटककार प्रेक्षकांना आपल्याकडे कसे ओढून घेतात, याचीं दोन उदाहरणें आपण पाहूं. खाडिलकर कलादृष्टयाहि उत्कृष्ट नाटककार असले, तरी त्यांची सर्व कला त्यांच्या तत्त्वप्रतिपादनाने संपूर्णतः व्यापिली आहे. पण आपलें हें तत्त्वज्ञान प्रेक्षकांच्या गळीं उतरविण्याचें त्यांचें कसब काय आहे! आपल्या प्रभावी तत्त्व प्रतिपादक मूळ कथानकांच्या जोडीला खालच्या अभिरुचीच्या व संस्काराच्या लोकांना आवडतील, अशी त्यांनी विनोदी पात्रें निर्माण केलीं. कीचकाच्या मूळ कथानकाच्या जोडीला त्यांनी सत्ताधीशापुढे पोटासाठी वाटेल तीं कामें करावयास तयार असणाऱ्या वर्गांतील (!) विनोदी पात्रें निर्माण केलीं. समजेल त्या प्रेक्षकांच्या मनांत अशा लोकांबद्दल उपहास बुद्धि निर्माण केली आणि सामान्य प्रेक्षकांची त्या मार्गानें करमणूकहि केली.

गडकऱ्यांची तर याहिपेक्षा विलक्षण किमया आहे. लक्षाधीशाची मुलगी सिंधू आपल्या तान्ह्या अर्भकाला पुरेसें दूधहि देऊं शकत नाही. लहानसें अर्भक तें. आशाळभूताप्रमाणे सिंधू दळत असलेल्या पिठाकडे पाहतें. मातेचें हृदय भडभडून येतें आणि त्या लहानशा अर्भकाला जणू कांही आपल्या परिस्थितीचे ज्ञान आहे, अशा समजूतीने म्हणते, 'असा हट्ट करूं नये. मागितल्या वेळीं दूध मिळावयाचे दिवस, राजा, आता आपले नाहीत रे! आपल्या लेखीं गोकुळीच्या गोठणी ओस पडल्या. देवा! लक्ष्मीनारायणा! 'कुबेर तुझा भांडारी, आम्हा फिरविसी दारोदारी, यांत पुरुषार्थ '—पण तुझ्याकडे काय दोष? बाळ अश्वत्थाम्याला त्याच्या आईने पीठपाणी कालवून देऊन त्याची दुधाची तहान कशी तरी भागविली. पण, बाळ, आपलीं नशीबं अगदीच पांगळीं आहेत. यांतल्या चिमूटभर पिठावरसुद्धा आपली सत्ता नाही. तें लोकांचें आहे. त्या पिठापाण्याचा ओघळ तुझ्या तोंडावर पाहिला तर, राजसा, तारामतीचा रोहिदास तुला हसून हिणवायचा नाही का!"

प्रसंगच असा अहे की, तो पाहून कोणाच्याहि हृदयांत कालवा कालव झालीच पाहिजे. पण आपली परिस्थिति वर्णन करतांना पौराणिक कथांतहि अत्यंत उचित व समर्पक अशा कथांची आठवण या प्रसंगाने काढून व त्या परिस्थितीशी आपल्या परिस्थितीची तुलना करून बहुजनसमाजाच्या अंतःकरणालाहि पीळ पाडला आहे. 'राजसंन्यासा'त तर अशा प्रसंगांची लयलूट आहे. हिरोजी येसूबाईंचे रक्षण करीत असतां स्वतःचा प्राण देतो. हा त्याचा लोकोत्तर त्याग पाहून येसूबाई—मराठी साम्राज्याची सम्राज्ञी—आपल्या इमानी सेवकाच्या पाया पडते. हें पाहून साबाजी गद्गद होऊन म्हणतो, 'तरीच जन्मा यावें। ईश्वर ईश्वराचें व्हावें' गडकऱ्यांच्या अपूर्व चातुर्यामुळे त्यांच्या नाटकांतील कितीतरी घटनांना अपूर्व अशी परिणामकारकता आली आहे.

Eric Capel हा रशियन नाट्यशास्त्रज्ञ, रशियन प्रेक्षकांना रशियन नाटकें आपल्या जीवनाशी संबद्ध असतात अशी खात्री असल्यामुळेच नाट्यप्रयोग आणि रंगभूमि यासंबंधी जिव्हाळा वाटतो, हें त्या रंगभूमीच्या उत्कर्षाचें मूळ कारण सांगतो नुकत्याच होऊन गेलेल्या महान् युद्धाच्या काळांत देखील रशियन लोकांनी व राष्ट्राने आपली रंगभूमि जिवंत ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला, एवढेंच नव्हे, तर प्रत्यक्ष युद्धभूमीवर देखील तिला राबविलें. सारांश, नाटककार आणि प्रेक्षक वा बहुजन-समाज यांचे संबंध इतके जिव्हाळ्याचे आहेत.—

व्हॅम्पायर

मूळ कथा—जॅन नेरूडा
अनुवाद—द. चिं. सोमण

● [झेक कथावाङ्मयांतील एका कथेचा हा अनुवाद आहे. आपल्याकडील टीकाकारांनी ह्या कथेचा दर्जा कोणताहि ठरवला, तरी वाचकांच्या स्मरणांतून ती लवकर जाणार नाही आणि हाच ह्या कथेचा विशेष !

व्हॅम्पायर—पिशाचाविशेष ! हें पिशाच देह व आत्मा ह्यांसह परत येऊन झोपलेल्या मनुष्यप्राण्यांचें रक्त पितें, असा समज कित्येक यूरोपीय देशांत प्रचलित आहे.]

★

प्रिन्किपो बंदरांत आम्ही बोटींतून उतरलों आणि बंदराबाहेर पडलों. कॉन्स्टॉन्टिनोपल व प्रिन्सेस आयलँडस् ह्यांच्या दरम्यान रोज ये–जा करणारी आमची ती आगबोट अर्थात्च लहानशीच होती. आम्ही उतरणारे उतारू अगदीच थोडे होतो. आम्ही दोघे आणि एक पोलिश कुटुंब–बाप, आई, त्यांची मुलगी आणि त्या मुलीचा प्रियकर. मुलीचें लग्न त्याच्याशीं होणार होतें ! —पण नाही, आमच्या बरोबर आणखीहि एक व्यक्ति उतरली. एक ग्रीक तरुण होता तो ! स्टॅम्बाउलला तो बोटींत चढला होता. गोल्डन हॉर्नवर तो लांकडी पूल आहे ना, त्यांवरून स्वारी आली आणि बोटींत चढली. तो ग्रीक तरुण चित्रकार असावा, असें त्याच्या हातांतील रेखाचित्रें काढायच्या वहीवरून आम्ही अनुमान काढलें. त्याचे खूप लांब केस खांद्यावर पडलेले होते, चेहरा फिक्ट होता आणि त्याचे ते काळेभोर डोळे खोल गेल्यासारखे दिसत होते. प्रथम त्याच्याशीं बोलावेसें वाटलें; फार सभ्य दिसली त्याची वागणूक व आम्ही ज्या भागांत प्रवास करीत होतों, त्याची खडान् खडा माहिती त्याला होती. पण फार बोलायचा तो, सारखें बोलतच राह्यचा, त्यामुळे अखेर मी त्याला एकटाच सोडलें.

तें पोलिश कुटुंब मात्र फार छान होतें. ती बाप आई अगदीं प्रेमळ होतीं आणि त्यांच्या वर्तनांत उद्धटपणा नव्हता. त्या मुलीचा प्रियकर देखणा, तरुण आणि कुणालाहि हवासा वाटणारा होता. तें कुटुंब तो सगळा उन्हाळा प्रिन्किपो येथे राहूनच घालविणार होतें. ती मुलगी अगदी अशक्त झालेली होती, त्यामुळे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रिन्किपोच्या उत्साहवर्धक हवेने तिची प्रकृति झपाट्यानें सुधारली असती. रक्त नसल्यामुळे त्या मुलीचा चेहरा अतिशय निस्तेज झाला होता. एखाद्या जिवावरच्या दुखण्यांतून ती नुकतीच उठली असावी किंवा एखादें तसलें दुखणें तिला आपल्या कवशांत घेत असावें, असें तिच्याकडे पाहिलें म्हणजे वाटे. बोटींतून उतरल्यावर आपल्या त्या प्रियकराच्या खांद्याचा आधार घेऊन ती चालत होती. दम लागला की, पांच पांच मिनिटांनी तिला थांबावे लागे. ती आणि तो प्रियकर अगदी हळू आवाजांत कांही तरी बोलत चालत होतीं. मधूनच तिचा कोरडा खोकला उसळे आणि तो केविलवाण्या नजरेने तिच्याकडे पाही. ती त्याच्याकडे बघतांना तिचे डोळे जणू म्हणत, 'छे, घाबरायला नको! कांही होत नाही मला!'

ती बरी होणार, अशी त्या कुटुंबाची खात्री होती.

एका फ्रेंच मनुष्याने प्रिन्किपोला एक सुंदर व्यवस्थेशीर हॉटेल काढलें होतें. त्या ग्रीकाने त्या हॉटेलची माहिती आम्हांला दिली व तिथेच उतरण्याची शिफारस केली तो मात्र आमच्या बरोबर हॉटेलमध्ये आला नाही. आम्ही बोटींतून उतरलों तेव्हा बंदरावरच त्याने आमचा निरोप घेतला. पुढे आम्हाला कळलें की, त्याचा तो निरोप तात्पुरताच होता.

हॉटेलमध्ये खोल्या घेतल्यावर दुपारचें भोजन आम्ही सर्वांनी बरोबरच आटोपलें. थोडीशी संध्याकाळ झाल्याबरोबरच आम्ही सर्व हॉटेलसमोरची ती मोठी उतरण उतरून पाईन वृक्षांच्या जंगलाकडे सहज फिरायला म्हणून जायला निघालों. विश्रांति घेण्याला योग्य अशी एक जागा पाहून आम्हीं बसलों मात्र, तोंच तो ग्रीक आम्हाला पुन्हा भेटला. त्याने न बोलतां आम्हांला वाकून अभिवादन केलें आणि सोयीस्कर जागा पाहून तोहि आमच्यापासून थोड्याच अंतरावर आपली चित्रें काढायची वही उघडून बसला.

"मला वाटतं, आपण त्याचें चित्र पाहूं नये, म्हणून मुद्दामच तो खडकाकडे पाठ करून बसला आहे.!" —मी म्हटलें.

"इथे दुसरं किती तरी बघण्यासारखं आहे, त्याचं चित्र पाहायला नाही सांपडलं, तरी काही अडायचं आहे थोडंच?"—तो तरुण पोल म्हणाला. कांही वेळाने त्या पोल प्रियकरानेच पुढे म्हटलें— "मला वाटतं, आपलींच रेखाचित्रं या सुंदर पार्श्वभूमीवर तो काढतो आहे ... ... आपली तरी कुठे ना आहे म्हणा! नाही का?"

खरोखरच तिथे पाहण्यासारखें दुसरें पुष्कळच होतें. प्रिन्किपोसारखें रमणीय स्थळ जगांत दुसरें नसेल. चार्लेमॅग्नेचा समकालीन इथेच महिनाभर हद्दपारीची शिक्षा भोगीत होता. मी महिनाभर प्रिन्किपोला राहिलों असतों, तर नंतरचें सारें जीवन प्रिन्किपोच्या आठवणी काढीत घालविलें असतें. तो एकच दिवस मी तिथे काढला, पण तो सुद्धा अविस्मरणीय आहे. हवा इतकी स्वच्छ होती की, क्षितिजापर्यंतचा सारा देखावा रेखीव दिसत होता. आशियाचे करड्या रंगाचे डोंगर उजवीकडे समुद्रांतून वर आलेले दिसत होते आणि डावीकडे नजर टाकली की, यूरोपच्या किनाऱ्याची निळी उतरण दूर अंतरावर दिसे. आमच्या जवळच एक बेट होतें. सायप्रेस वृक्षांच्या त्याच्यावरच्या राया पाहून वाटे की, तें सारें दृश्य स्वप्नांतच दिसतें आहे. त्याच बेटांवरची एक उंच इमारतहि आम्ही बसलों होतों तिथून गोचर होत होती... वेड्याचें इस्पितळ होतें तें!

मावळतीच्या समुद्रावर रंगीबेरंगी लाटा उतरत्या उन्हांत चमकत पळत होत्या त्या समुद्राचा आमच्या जवळचा भाग तांबूस दिसे आणि दूरचा दुधासारखा पांढराशुभ्र ! एक देखील गलबत ऐन समुद्रांत तरंगत नव्हतें, परंतु किनाऱ्याजवळ मात्र इंग्लंडचा ध्वज लावलेल्या दोन लहान नौका इकडे तिकडे फिरत होत्या, दुसरीहि एक नाव वल्हवीत कांही खलाशी माना वाकवून बसलेले दिसत होते. त्यांचें वल्हें पाण्यांतून बाहेर निघतांना चांदीचा रस खाली पाडी. मधून मधून आकाशांत मोठमोठे गरुड पक्षी एका खंडांतून दुसऱ्या खंडांत जातांना दिसत.

आमच्या आजूबाजूला सगळीकडे गुलाबाचीं झाडें होतीं व प्रत्येक झाड फुलांत लपलें होतें. गुलाबांचा सुवास हवेंत दरवळत होता आणि किनाऱ्यावरील हॉटेलमधलें संगीत अस्पष्ट असें ऐकूं येई !!

सौख्याधीन होऊन आम्ही संभाषण थांबवलें होतें. आमच्यापैकी प्रत्येकजणच देहभान विसरला होता. प्रियकराच्या छातीवर मस्तक टेकून ती मुलगी गवतावर बसली होती. तिचा फिकट चेहरा थोडासा उत्तेजित दिसत होता. एकाएकीं तिच्या त्या निळ्या डोळ्यांतून अश्रु झरायला लागले. तिच्या प्रियकराला तिच्या भावना समजल्या; त्याने खाली वाकून तिचीं आसवें हलकेंच ओठांनी पुसायला आरंभ केला. तिच्या आईच्याहि डोळ्यांत अश्रु उभे राहिले. मलाहि त्या मुलीकडे बघवे ना !

"इथे कुणीहि अमर होईल !"—ती मुलगी हळू आवाजांत म्हणाली, "किती सुरेख, पवित्र आहे हें सारं !"

"मला कुणी शत्रु नाही. पण असता आणि इथे त्याची माझी भेट झाली असती, तर क्षणार्धांत मीं त्याला क्षमा केली असती !"—बाप म्हणाला. त्याचा स्वर कंपित झाला होता.

पुन्हा आम्ही सर्वजण निःशब्द झालों. प्रत्येकजण अनुपम सुखाचा अनुभव घेत होता व दुसराहि तसाच सुखी असावा, अशी इच्छा करीत होता. प्रत्येकाला दुसऱ्याचें अंतःकरण कळत असल्यामुळे भाषेची आवश्यकताच नव्हती.

तासभर वहींत रेघा ओढून तो ग्रीक चित्रकार आम्हांला अभिवादन करून उठून गेला. आम्ही तिथेच थांबलों.

शेवटीं आकाशांत जांभळट छटा पसरायला लागली, तेव्हा त्या मुलीच्या आईने आम्हांला परतायची आठवण केली. हॉटेलकडे आम्ही हळू-हळू निघालों, परंतु आमच्या हृदयांत चैतन्य मावत नव्हतें.

हॉटेलच्या समोरील व्हरांड्यांत आम्ही बसलों. थोड्याच वेळांत बाहेरून भांडणाचा आवाज आमच्या कानावर आला. आवाजावरून तो तरुण चित्रकार आणि आमच्या हॉटेलचा मालक ह्यांच्यांत ती बोलाचाली चाललेली होती, हें आम्ही ओळखलें. करमणूक करून घेण्याच्या इच्छेने आम्ही तें भांडण ऐकूं लागलों. पण तें भांडण फार वेळ चाललें नाही.

"इतर लोक— सभ्य लोक— हॉटेलमधे आहेत म्हणून, नाही तर……" हॉटेलचा मालक व्हरांड्याकडे येतां येतां म्हणाला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"काय झालं ? —कोण आहे तो ग्रीक ? —चित्रकारच ना ?" —तो आमच्या टेबलाजवळ आल्यावर आमच्यापैकी त्या पोल तरुणाने विचारलें.

"कुणास ठाऊक, काय नांव आहे त्याचं !" —हॉटेलचा मालक तिरस्काराने म्हणाला, "कांही का असेना ! आम्ही सर्वजण त्याला 'व्हॅम्पायर' म्हणतों. व्हॅम्पायरच आहे तो. पिशाच्च !!"

"चित्रकार आहे तो !"

"तें काय विचारतां, अगदी अलौकिक चित्रकार ! फक्त प्रेतांचीं चित्रें काढायचीं हा त्याचा धंदा ! वा रे चित्रकार ! कलावंतच की नाही मोठा ! इथे कुठे किंवा अगदी कॉन्स्टॉन्टिनोपलच्या सुद्धा आसपास कुणी मेल्याचं कळायचाच अवकाश की, त्याचं चित्र त्याच दिवशीं ह्याच्याजवळ तयार— गिधाड !—कुणी लवकरच मरायचं असलं की, अगोदर कळतं ह्या यमदूताला आणि त्याचं चित्र तयारच करून ठेवतो तो—सैतान !—सैतान !—व्हॅम्पायर !—कधीच चूक नाही व्हायची ह्या सैतानाची !—व्हॅम्पायर !!!

मुलीची म्हातारी आई कांही तरी किंचाळली; मुलीला मूर्च्छा येऊन ती खालीं पडतां पडतां आईने तिला सावरून हृदयाशीं घट्ट धरलें. मुलीचा चेहरा प्रेतासारखा निर्जीव, पांढरा झाला होता.

त्या पोल तरुणाने पायऱ्यांखाली उभा असलेल्या त्या तरुण ग्रीक चित्रकारावर व्हरांड्यांतूनच झेप टाकली आणि एका हातांत त्याची मान धरून दुसऱ्या हाताने त्याची ती चित्रांची वही हिसकावून घेतली.

आम्हीहि परत व्हरांड्याच्या पायऱ्या उतरून खाली आलों. तो ग्रीक व त्या मुलीचा प्रियकर तो पोल तरुण खालीं धुळींत एकमेकांचा गळा दाबायचा प्रयत्न करीत होते !

चित्रकाराची ती चित्रें काढायची वही उडून दूर पडलेली होती व तिच्यांतील सुटे झालेले कागद इकडे तिकडे पडले होते. त्यांतल्या एका कागदावर त्या पोलिश मुलीचा रेखीव, आत्मविश्वासाने काढलेला चेहरा आम्हांला दिसला.

तिचे डोळे मिटलेले होते व तिच्या कपाळावर प्रेतांना चढवितात त्या पद्धतीने चढविलेली पुष्पमाला होती !!!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९४८
बुढे-मॉगढ

कला आणि योग

बालकृष्ण मार्तण्ड दाभाडे
एम्.ए.

● ग्वाल्हेरचे शिक्षणाधिकारी रा. दाभाडे ऊर्फ 'शशांक' यांनी प. वा. डॉ. कुमारस्वामी यांच्या एका चिमुकल्या लेखाच्या आधारें 'कला आणि योग' यांचा संबंध या लेखांत विशद केला आहे.

★

भारतीय कलेच्या इतिहासांत कला ही सुद्धा एक प्रकाराने 'योगच' म्हणून मानली गेली आहे. योगांत व्यक्ति व चिन्तनविषय यांची एकरूपता व्हावी लागते. योग ही समाधी आहे. कलावन्ताला सुद्धां कलाकृती निर्माण करतांना योगमार्गाप्रमाणे एकाग्रतेची— समाधीची— आवश्यकता असते. शुक्राचार्य लिहितात— "ज्या मूर्तींची स्थापना देवालयांतून करावयाची असते, त्या मूर्ती निर्माण करण्यास कलावन्तास समाधीची आवश्यकता आहे. मूर्ती तयार करण्यास पुढे प्रत्यक्ष पदार्थ असूनहि भागत नाही. एकाग्रपणें मानसिक चिन्तनाशिवाय योग्य मूर्ती निर्माण होणें शक्य नाही."

शंकराचार्यांनी ब्रम्हसूत्रांत (३, २, १०) मोहावस्था व जागृतावस्था यांतील फरक स्पष्ट करतांना पुढील उदाहरण घेतलें आहे. "बाण करणारा कारागीर बाण तयार करीत असतांना एवढा एकाग्र झालेला असतो की, त्याला शुद्धहि नसते. पण त्याला त्यावेळीं संवेदना व इन्द्रियावर ताबा चालविण्याची शक्ति असते. ही मोहावस्थेंत असणाऱ्या व्यक्तींत असूं शकत नाही." एकाग्रतेचा हा गुण योग्यांना स्पष्ट करून सांगतांना अनेक ठिकाणीं बाण करणाऱ्याचें उदाहरण घेऊन स्पष्ट केलेला आढळतो.

अग्निपुराणांत (अ० ४३) कला व स्वप्न यांच्या संबंधाबद्दल पुढील उल्लेख आढळतो. कलाकृती निर्माण करण्यापूर्वी पहिल्या रात्रीं शुचिर्भुत होऊन झोंपण्यापूर्वीं पुढीलप्रमाणे प्रार्थना करून झोंपी जावें—" हे देवाधिदेवा, मला जी कलाकृती निर्माण करावयाची आहे, ती कशा रीतीने पूर्ण करावयाची, याबद्दल स्वप्नांत साक्षात्कार दे!" आधुनिक मानसशास्त्रांतील स्वप्नमीमांसा याहून दुसरें काय सांगते!

पूजा आणि कला यांमध्ये अंत:साक्षात्काराच्या दृष्टीने समानता असते असें शुक्राचार्य सांगतात. पूजक हा ध्यानमंत्र म्हणत असतांना त्या मंत्रांतील वर्णनाबरहुकूम देवतेची मूर्ती आपल्या अंतश्चक्षूपुढे उभी करतो व तिचे तो पूजन करीत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

-असतो. कलावन्तहि याच मार्गाने पुढे जाऊन तीच अन्तश्चक्षूपुढील मूर्ती प्रत्यक्ष साकार करण्याचा यत्न करतो.

बौद्धांच्या वाङ्मयांत कलावंताने मूर्ती निर्माण करतांना आपल्यापुढे आदर्श कसा ठेवावा, याबद्दल पुढील उल्लेख अत्यंत चिन्तनीय आहे— "कलावंताने (यालाच साधक, मंत्री, योगी असेंहि म्हटलें आहे) शुचिर्भूत होऊन निर्जन व एकान्त स्थळीं जावें. तिथे गेल्यावर त्याने सात गोष्टी कराव्यात. प्रथम बुद्धांस व बोधिसत्त्वांस आवाहन करावें. नंतर त्यांना प्रत्यक्षपणें अथवा मानसिक पुष्पें समर्पण करावीं. नंतर मनांत चतुर्विध वृत्ती निर्माण कराव्या—(अमित्रता, दया, सहानुभूति व न्यायीपणा.) नंतर जगाच्या शून्यतेचें चिंतन करावें. म्हणजे साऱ्या जगाला त्याने पूर्ण विसरून जावें व त्यानंतर ज्या देवाची मूर्ती त्याला करावयाची असेल त्याबद्दलचे बीजमंत्र म्हणून ती मूर्ती अन्तश्चक्षूपुढे निर्माण करावी. त्या मूर्तीशीं त्याने ध्यानद्वारा पूर्ण एकरूप व्हावे. ध्यानेमन्त्रांत वर्णिल्याप्रमाणे हुबेहुब मूर्ती साकार होऊन त्याच्या ज्ञानचक्षूला स्पष्ट दिसूं लागेल. हाच त्याचा आदर्श (Model) स्वप्नसाक्षात्काराचा जागृतीवस्थेंतील हा साक्षात्कार होय. त्यावरून कलावन्ताने आपली कलाकृती निर्माण करावी. आधुनिक सौंदर्यशास्त्रांत अनेक ठिकाणीं असेच विचार आढळून येतात ही लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. Goethe म्हणतो– "He who attains to the vision of beauty is from himself set free" Riciotto Canudo लिहितो– "The secret of all art is selfforgetfulness. Laurence Binyon चे उद्गारहि असेच आहेत– "we too should make ourselves empty, that the great soul of the universe may fill us with its breath."

बौद्ध वाङ्मयांत सांगितलेल्या वरील धार्मिक तंत्राकडे जरी दुर्लक्ष केलें, तरी त्यांतील शास्त्रीय तत्त्व उपेक्षणीय खास नाही. मनाची एकाग्रता होण्यासाठी हा बाह्य उपाधींचा व्याप नष्ट करावयासच हवा. (Wagner speaks of "an internal sense' which becomes clear and active when all the others, directed outward, sleep or dream.) नन्तर उद्दिष्ट मूर्तीशीं एकरूप व्हावयास पाहिजे. (देवं भूत्वां देवं यजेत) आणि मग शेवटीं ती मूर्ती दृष्टीपुढे स्पष्ट प्रगट होते. (He who does not imagine in stronger and better lineaments, and in stronger and better light than his perishing mortal eye can see, does not imagine at all"—Blake.)

कला म्हणजे योगच आहे. अशाबद्दल आपल्या पौराणिक ग्रंथांतून अनेक उल्लेख काढून दाखवितां येतील. रामायण रचण्यापूर्वी वाल्मीकि ऋषि योगसमाधी लावून बसले होते. या योगसामर्थ्यामुळे त्यांना रामायणामधील सर्व भूमिका व त्यांचीं चरित्रें स्पष्ट दिसूं लागलीं. या एकाग्रतेने हें सर्व दृश्य प्रथम स्पष्ट आकलन केल्यावर वाल्मीकींनी रामायण लिहिण्यास सुरुवात केली.

वस्तुत: कलाकृती ही मूर्त-व्यक्त-स्वरूप घेण्यापूर्वीच पूर्ण झालेली असते. म्हणूनच Chuang Tzu म्हणतो "—The mind of the sage being in repose, becomes the mirror of the universe, the speculum of all creation," म्हणून Croce या प्रसिद्ध लेखकाने काढलेले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुढील उद्गार अत्यंत चिंतनीय आहेत:—" The artist, who never makes a stroke with his brush without having previously seen it with his imagination, implies a vigilant will, which persists in not allowing certain visions, intentions or representations to be lost."

एकाग्र मनाला योगसाधनांच्या योगाने बाह्येन्द्रियांच्या मदतीवाचून ज्ञानप्राप्ती करतां येणें शक्य असते, असें आपला धर्म सांगतो. सर्व प्रतिभाशाली कलावन्त, शास्त्रज्ञ, संशोधक, कवी यांना या गोष्टींची पूर्ण जाणीव असते. पण शेवटीं हेंच सांगावयाचें कीं, योग हा कलावन्ताचें साधन आहे, साध्य नाही, हें विसरून भागणार नाही.

चीन आणि जपानमधील प्राचीन कलावन्तांचीं चरित्रें अवलोकन केलीं, तर हेंच दिसून येते की, ते सर्व योगी होते. कलेचे साध्य गाठण्यासाठी ते योगमार्गाचें साहाय्य घेत असत. चित्रकलेस जरूर असणारा प्राथमिक अभ्यास त्यांना करावा लागत असेच व तो ते करीत असतच. परन्तु त्यांच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट कोणती असेल, तर ती ' वर्ण्यविषयाशीं तद्रूपता ' हीच होय. वर्ण्यविषयांशीं एकरूप होतांना ते बाह्योपाधी विसरून जात असत. प्रपात निसर्ग, एखाद्या व्यक्तीचा चेहरा अथवा कोणताहि विषय—ज्याचें ते आलेखन करूं इच्छितात—चित्रित करण्यापूर्वी त्यांशीं एकरूप होण्याची आवश्यकता असते. द्रोणाचार्यांच्या परीक्षेंत अर्जुन एकटाच उत्तीर्ण झाला, याचें कारण काय ! त्याला ज्या पक्षाचें मस्तक छेदावयाचें होतें, त्या पक्षाचा कण्ठच केवळ दिसत होता. इतर बाह्य गोष्टींचें स्मरण लुप्त झालें होतें. Li Lung Mein या चीनी चित्रकाराची गोष्ट नमूद आहे की, तो पर्वत, निर्झर यांच्या सान्निध्यांत समाधी–स्वरूपांत बसलेलाच आढळे. बादशहाने एकदा Tao-tse या चित्रकारास एक निसर्गचित्र काढण्याची आज्ञा केली. तो चित्रकार चित्र न काढतां बादशहाजवळ आला. बादशहाने प्रश्न करतांच तो उत्तरला, ' मी तो निसर्गाचा आलेखनीय भाग माझ्या हृदयांत ठसवून घेऊन आलों आहे ! ' परन्तु या समाधींतून निर्माण होणारी कलाकृती बुद्धिस्पर्शी न रहातां आत्मस्पर्शी रहाते. आत्म्याचा तो रम्य आविष्कार होतो. गटेला मुद्दा याची कल्पना होती, तो म्हणतो– " The highest works of art are those which possess the highest truth, but not trace of (objective) reality." लिओनार्डोचीं चित्रें अवलोकन केलीं, तर बुद्धीच्या गाळणींतून निर्माण झालेलीं वस्तुदर्शनात्मक चित्रें आपण पहात असल्याचा भास होतो. त्यात कुठें परतत्त्वाचा भासहि भासमान् होत नाही. परंतु पौर्वात्य चित्रें पाहिलीं तर तीं चित्रकाराच्या अन्त:साक्षात्काराच्या भट्टींतून नवें स्वरूप घेऊन बाहेर पडलेली आहेत याची जाणीव होते. कोणत्याहि केलेचें श्रेष्ठत्व त्यांतील विषयावर अथवा तंत्रकौशल्यावर नसून त्या कृतींतून कलावंताचें व्यक्त होणारें जीवनविषयक उच्च रसरसीतं तत्त्वज्ञान यावर अवलंबून आहे. हें तत्त्वज्ञान व्यक्त होण्यासाठी कलावंतास ज्या साधनेंतून जावें लागतें, तिचें स्वरूप आध्यात्मिक असेल तर कलाकृतींत एक प्रकारचें वस्तुनिरूपण शक्य आहे. अर्थात् केवळ निरूपणाहून (Interpretation) अपूर्वनिर्मिती अधिक महत्त्वाची आहे. त्यासाठी साक्षात्काराचीच आवश्यकता आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यसमालोचन

संपादक

१. रावबहादूर दादोबा पांडुरंग (संपादक व चरित्र लेखक—अ. का. प्रियोळकर; प्रकाशक—केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ सदन, गिरगांव, मुंबई ४. किं. रु. १२) मराठी भाषेचे आद्य व्याकरणकार कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांनी लिहून ठेवलेलें आत्मचरित्र या पुस्तकांत दिलेलें असून आत्मचरित्रांत न आलेला त्यांच्या चरित्राचा उर्वरित भाग रा. प्रियोळकर यांनी लिहिलेला आहे. हें आत्मचरित्र प्रथम कै. ल. रा. पांगारकर यांनी 'विविध ज्ञान विस्तार' मासिकांत क्रमशः प्रसिद्ध केलें होतें, तेव्हाच त्याच्याकडे अभ्यासकांचें लक्ष वेधलें गेलें होतें. तें इतर सोपस्कारांसह पुनर्मुद्रित करून प्रियोळकर यांनी बहुमोल वाङ्मयकार्य केलें आहे. परिशिष्टांत 'दादोकृत शिशुबोध' दिलेला असून आरंभीं प्रा. रा. कृ. लागू यांचा 'आत्मचरित्र, चरित्र आणि आठवणी' हा प्रबंध जोडलेला आहे. एकंदरीने रा. प्रियोळकर यांनी या ग्रंथाचें संपादन उत्कृष्ट रीतीने केलें आहे, यांत शंका नाही.

दादोबांच्या आत्मचरित्राचा त्या जातीच्या वाङ्मयांत मोठी योग्यता आहे. तें वाचून एका सत्त्वशील विद्वानाची मूर्ति डोळ्यापुढे उभी राहते. दादोबांची भाषाहि साधी, पण सोज्वळ आहे.

रा. के. भि. ढवळे यांनी ग्रंथाचें बाह्यांग अंतरंगासारखेंच सुंदर केलेलें आहे व आपल्या कीर्तींत भर टाकली आहे.

२. दूधसागर (कवि— बा. भ. बोरकर; प्र. के. भि. ढवळे, मुंबई ४, किं. रु. १।।) प्रसिद्ध कवि रा. बोरकर यांच्या सत्तेचाळीस कविता या संग्रहांत आलेल्या आहेत. किंचित् संस्कृतप्रचुर, पण अत्यंत नादमधुर व रेखीव भाषाशैलीमुळे बोरकरांची कोणतीहि कविता रसिकांचें लक्ष्य वेधून घेते. त्यांच्या रचनेंत भावनेचा जिव्हाळाहि भरपूर असून त्यांचीं वर्णनें जिवंत असतात. शृंगाररस त्यांना उत्तम साधतो. तात्पर्य, विद्यमान कवींत बोरकरांचें मानाचें स्थान कायम राहील, अशाच योग्यतेचा हा संग्रह आहे.

'सूर्याचें प्रेमगीत' व 'शांतीचा जयजयकार' या कवितांवर कुसुमाग्रजांची उघड छाप दिसते. कोणत्याहि कवीच्या आरंभीं-आरंभींच्या कवितांवर दुसऱ्याची छाप असणें स्वाभाविक व क्षम्य असते. पण उत्तरोत्तर हा प्रकार कमी व्हावयास पाहिजे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

३. रुद्रवीणा (कवि-वा. रा. कांत; प्र. न. मा. कुळकर्णी, प्रतिभा-प्रकाशन औरंगाबाद. किं. रु. ३) विख्यात कवि कांत यांच्या, कवितांचा हा संग्रह आहे. ' अग्निपथ ' व ' आशिया ' ही कांतांची दीर्घ काव्यें 'युगवाणी'त प्रसिद्ध झालेलीं असल्यामुळे 'युगवाणी'च्या वाचकांस त्यांच्या तेजस्वी प्रतिभेचा परिचय झालेलाच आहे. कांत यांचें विद्यमान मराठी कवींत विशिष्ट स्थान आहे. ओजस्वी कविता लिहिणारे मराठींत इतरहि कांहीं कवि आहेत; पण ओजस्विता हा गुण ज्यांच्या कवितेंत विशेष प्रकर्षानें आढळतो, असे कांत हे एकटेच कवि आहेत ! त्यांचा हा गुणविशेष या संग्रहांतहि फार मोठ्या प्रमाणांत व्यक्त झाला आहे. यामुळे हा संग्रह वैशिष्ट्यसंपन्न वाटतो, असें म्हणावयास हरकत नाही.

कांतांचीं प्रेमगीतें एकंदरीनें चांगलीं असलीं, तथापि त्यांत असें वैशिष्ट्य मात्र नाही.

' अग्निपथ ' व ' आशिया ' हीं काव्यें याच संग्रहांत समग्र दिलीं असतीं, तर त्याचें मोल आणखी वाढलें असतें.

' रुद्रवीणा ' या संग्रहानें मराठी काव्यवाङ्मयांत बहुमोलाची व वैशिष्ट्य-संपन्न अशी भर पडलेली आहे.

४ पद्मपद्माकर (कवि.— कै. अ. सी. साठे व कै. नी. व. भवाळकर; प्र. सुविचार-प्रकाशन-मंडळ, नागपूर. किं. रु. २) ' पद्मपद्माकर ' संग्रहाच्या प्रथमावृत्तींत साठे-भवाळकरांच्या प्रसिद्ध झालेल्या कविता या द्वितीयावृत्तींत घेत-लेल्या असून शिवाय त्यांत त्यांच्या इतर कवितांची भर टाकलेली आहे. नामदार अणे, रा. अळेकर, म. म. बुलेशास्त्री, रा. माडखोलकर-प्रभृतींचे गद्य लेख आरंभीं जोडले आहेत, त्यांमुळे पुस्तकाच्या उपयुक्ततेंत भर पडली आहे.

कै. अच्युतराव साठे व कै. नी. व. भवाळकर हे दोघेहि अत्यंत रसिक व विद्वान् साहित्यिक होते. त्यांच्या कविता जुन्या वळणाच्या—व कांहीं अनुवादित—असल्या तथापि त्यांवरून त्यांची रसिकता व्यक्त होते.

५ अंतरिक्षांतून (ले.— सौ. सिंधु गाडगीळ; प्र. प्र. ना. खोडे, अकोला, किं. रु. २॥) वैमानिक जीवनावरील हा मराठींतील पहिलाच कथासंग्रह होय, या दृष्टीनें या पुस्तकास महत्त्व आहे. नवीन वातावरणामुळे कथा वाचनीय वाटतात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुप्त सरस्वती

(साहित्यिकांचा पत्रव्यवहार)

प्राध्यापक ग. श्री. हुपरीकर, एम्. ए.

● प्रा. ग. श्री. हुपरीकर ऊर्फ कवि विरागी यांचीं
प्रा. ब. ग. खापर्डे यांस दोन पत्रें.

(१)

ता. ७-७-३०

प्रो. ब. ग. खापर्डे, बनारस, यांस—

अध्यात्मवादी कविता लिहिणाऱ्याच्या कवितेंत आत्मचैतन्याविषयक अनुभव संपूर्णतया येऊन गेलेले असतातच, असें नाहीं; पण श्रीज्ञानेश्वरमहाराजांप्रमाणे ज्या ज्या कवींनी अभेदानुभवाचा 'सिद्धानुवाद' आपल्या वाङ्मयकृतींत केला आहे, त्यांच्या त्यांच्या त्या त्या कृतींत तो अमर्याद अनुभव संपूर्णत: येऊन गेला असल्या कारणाने, त्या कृतींचा अंतर्भाव आध्यात्मिक कवितेंत करणें योग्य होय. असा अद्वैताचा पूर्ण साक्षात्कार झालेले आदर्शभूत कवि हाताच्या बोटावर मोजण्या इतकेच महाराष्ट्रांत होऊन गेले असल्याने, मराठींतील बऱ्याचशा आध्यात्मिक कवितेंत आत्मचैतन्याच्या संपूर्ण अनुभवाचा अद्वैतानुभवाचा आढळ न होतां, गूढ अज्ञाताशीं—आत्मचैतन्याशीं मीलन घडण्यासाठीं झालेली अंत:करणाची तळमळ, आतुरता व ओढच अधिक प्रतीत होते; व अशी मीलनाची ओढ प्रकट करणारी कविताच बहुधा 'आध्यात्मिक कविता' या नांवानें ओळखिली जाते. परंतु अध्यात्मवादी कवितेंत केवळ अज्ञाताकडील ओढ एवढीच भावना अंतर्भूत न करतां पूर्ण अद्वैतानुभवाचे काव्योद्गारहि समाविष्ट करणें आवश्यक आहे. अर्थात् अद्वैतानुभव व्यक्त करणारे श्रेष्ठ कवि अध्यात्मवादी लक्षणांतून वगळले जाऊं नयेत; व संपूर्ण अद्वैतानुभवाची कविता एकंदर वाङ्मयांत अल्प असते, हें जरी खरें, तरी ती 'आध्यात्मिक काव्या'च्या लक्षणांत अंतर्भूत होणें इष्ट आहे. तेव्हा प्राप्तध्येय कवि व अप्राप्तध्येय कवि हे दोघेहि ध्येयवादी (Idealistic) असल्यामुळे ते आध्यात्मिक कवीच होत, असें ठरवावें लागतें.

प्रतीकयोजनेंत (Symbolism मध्यें) उपमेपेक्षा रूपकच अधिक प्रमाणांत उपयोजिलें जातें. या रूपकयोजनेंत (१) कथितोपमेय रूपक व (२) अकथितो-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१३४८
मुळे-मॉगाह

पमेय रूपक अथवा रूपकातिशयोक्ति —असे दोन प्रकार दिसून येतात. कथितोपमेय रूपकांत उपमान व उपमेय हीं दोन्ही बिंबप्रतिबिंब न्यायानें मांडली जातात; व यासच इंग्रजींत ‘ Parallelism ’ असें नांव दिलें जातें. तसेंच, अकथितोपमेय रूपकांत उपमेय हें निगीर्ण (गुप्त) असून केवळ उपमानद्वाराच भाव व्यक्त केला जातो. अर्थात प्रतीकयोजनेंत साम्यदर्शक उपमेपेक्षा अभेददर्शक रूपकाचा उपयोग करण्याचीच जास्त प्रथा आहे, असें दिसून येतें.

—गणेश श्री. हुपरीकर

(२)

ता. २१-११-३२

प्रो. व. ग. खापर्डे, बनारस, यांस—

माझ्या ‘ सच्चिदानंद ’ या लेखांत महात्म्यांचा परोपकार हा एक प्रकारचा स्वार्थ होय, असें जें म्हटलें आहे ’ त्यावर आपण ‘ उदात्त कल्पनांना स्वार्थाच्या भाषेंत बसविण्याचा यत्न केला आहे, असें म्हणून थोडी अरुचि दाखविली आहे. पण मी स्वार्थाची संकुचित किंवा व्यावहारिक दृष्टि घेत नाही. समग्र विश्व व ‘मी’ (अहम्) हीं अभेदरूप झाल्यावर जी अपार्थिव व अमर्याद आत्मसत्ता (ज्ञानेश्वरांच्या भाषेंत ‘ पूर्णाहंता ’) चोहोकडे येते, तिलाच मी ‘ व्यापक स्वार्थ ’ म्हणतो. ‘ स्वार्थ ’ हा शब्द भाषेंत हीनत्वसूचक गणला गेल्यामुळे आपणांस ही कल्पना कदाचित पटली नसेल. पण तात्त्विक दृष्टीने लिहितांना ‘ संकुचित स्वार्थ ’ व ‘ अमर्याद स्वार्थ ’ (आत्मत्व) किंवा ‘ अहंता ’ व ‘ पूर्णाहंता ’ यांचें मूळ स्वरूप एकच आहे, केवळ उपाधीमुळे त्यांत भेद किंवा उच्चनीचपणा व्यावहारिक दृष्ट्या जरी भासला, तरी वस्तुतत्त्वदृष्ट्या (म्हणजे अन्वयदृष्टीने— एका आत्मरूप दृष्टीने) त्यांत भेद नाही, असेंच सिद्ध करावें लागतें. ही केवळ ‘ कल्पना ’ किंवा ‘ कोटि ’ नव्हे, तर वस्तुस्थिति आहे. महात्म्यांचा परोपकार हा व्यावहारिक दृष्टीने ‘ पर + उपकार ’ जरी वाटत असला, तरी महात्म्यांचें आत्मत्व विश्वव्यापी असल्याने व त्यांना ‘ पर ’ व ‘ स्व ’ हा भेद भासत नसल्यामुळे, व्यावहारिक शब्दांनी दर्शित केलेला हा ‘ परोपकार ’ म्हणजे तात्त्विकदृष्ट्या एक आत्मत्वच आहे. कारण विश्व व महात्मा हीं दोन्ही मिळून एक अमर्याद आत्मसत्ता— पूर्णाहंताच होय; व मी ज्याला ‘ अमर्याद स्वार्थ ’ म्हणतों, तो हाच होय. ‘ स्वार्थ ’ हा शब्द हीनसंकेतसूचक वाटत असेल, तर तो गाळतां येईल; पण माझ्या मतलबांत फरक पडत नाही. अर्थात् तात्त्विकदृष्ट्या हा मतलब सत्य आहे, असें अल्पमतीस वाटतें.

—गणेश श्री. हुपरीकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आधुनिक कवितेच्या निमित्ताने—
मराठीच्या काव्यपरिसरांत—

म. ना. लोही, बी. ए.

मुंबईचे कवि प्रा. पु. शि. रेगे यांनी ‘ युगवाणी ’च्या ऑगस्ट १९४७ च्या अंकांत ‘ आधुनिक कवितेच्या निमित्ताने ’ कांही जुनेच काव्यविषयक प्रश्न उपस्थित केले असून अलिकडील कवितेवर बरीच आग पाखडली आहे. तरी त्यांचे विचार कितपत सयुक्तिक आहेत, याचा विचार प्रस्तुत लेखांत करूं या.

त्यांना हाउसमनची काव्यविषयक कल्पना बरीच पसंत आहे. ‘ वाचनानंतर पोटांत कसेंसेंच होणें हीच काव्याची खरी कसोटी ’ त्यांना मान्य आहे. आपल्या साहित्यविषयक ग्रंथांत हेच विचार निराळ्या शब्दांत मांडला आहे, एवढेंच ! ‘ ज्याच्या योगाने अंतःकरणांत रसाची-प्रतीति होते, तें उत्तम काव्य. ’ याच्याच अनुषंगाने ‘ काव्येषु नाटकं रम्यं ’ अशी उक्ति संस्कृत कवीने काढली असावी. हाउसमनने या अंतःकरणाला ‘ पोट ’ या नावाने संबोधण्याचा पुरोगामीपणा दाखवला आहे !

पण, त्यांच्या पुढील काव्यविषयक कल्पना मात्र बऱ्याच अंशीं चूक आहेत. त्यांत त्यांनी बाह्यांगाचाच विचार केलेला आढळतो. ते म्हणतात— “ उत्तम काव्यांत शब्दयोजना इतक्या यथातथ्यतेने केलेली असते की, इकडचा शब्द तिकडे फिरवतां येत नाही, किंवा एका शब्दाऐवजीं दुसरा वापरतां येत नाही. थोड्याशा विरोधाभासाने असें म्हणतां येईल, की, शब्दयोजना इतकी अनपेक्षित हवी की, वाचकाला तीच स्वाभाविक वाटायला हवी. ” यांत सुद्धा ‘ रमणीयार्थ प्रतिपादकः शब्दः काव्यम् ’ ही जगन्नाथकृत कल्पनाच आढळत नाही काय ? काव्य हें अर्थ लहरींत असलें आणि विशिष्ट शब्दयोजनेंतून रमणीय अर्थ प्रतीत होत असला तरी शब्द हे कवीच्या व्यक्तिमत्वाचे घटक होत. ‘ पोटांत मळमळून आल्याने ’ कवि काव्यरचनेला प्रवृत्त होत असतो. तो उत्कट भावनांचा उद्रेक (Spontaneous overflow of powerful feelings) शब्दांचें रूप धारण करूनच बाहेर पडत असतो. आयुष्यांत प्रथमच गंगेचें दर्शन घडतांच, आई गंगे भागीरथी लोळावें वाटतें तुझ्या पुलिनीं ... . ’ असे प्रासादिक उद्गार मोरोपन्ताच्या मुखांतून बाहेर पडले. ब्रायटनच्या ब्रिटिश किनाऱ्यावर सागराच्या दर्शनाने सावरकरांना मातृभूमीचें स्मरण होऊन त्यांच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह आणि मुखावाटे काव्यपंक्ति बाहेर पडल्या. हें दृश्य पाहिल्याचें त्यांचे लेही श्री. पाल सांगतात. यावरून काय आढळतें ? कवीला शब्दाची ओढाताण करावी लागत नाही. त्याच्या व्यक्तित्वानुरूप योग्य रचना होत असते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नंतर त्यांनी दोन शंका काढल्या आहेत. एक, रुचिवैचित्र्याबद्दल आणि दुसरी, आनंदविषयक " एकाला आवडतें तें दुसऱ्याला आवडत नाहीं; आज ज्याला नाकें मुरडलीं जातात, तें उद्या डोक्यावर घेऊन नाचलें जातें—किंवा कधीं याच्या अगदीं उलट !—!! व्यक्तिविषयक रुचिवैचित्र्य हें सर्वस्वी व्यक्तित्वावर (personality) अवलंबून असतें. 'व्यक्ति तितक्या प्रकृति' ही म्हण सर्वपरिचित आहेच. याचें कारण शोधूं गेल्यास मानसशास्त्राच्या अंतरंगांत शिरावें लागेल. सामाजिक अभिरुचीबद्दल बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय वातावरणामुळे एक सामाजिक दृष्टिकोन तयार होत असतो. प्रत्येक माणसांत नैसर्गिक फरक असला, तरी देशविषयक सामान्य असे विशेष असतातच. हिंदुस्थानच्या लोकांचा ताम्रवर्ण, सांस्कृतिक ऐक्य, धर्मविषयक कल्पनासाम्य इ. कितीतरी गोष्टी दाखवितां येतील. याच दृष्टिकोनांतून त्या काळांतील वाङ्मयच नव्हे तर प्रत्येक गोष्ट निरखली जाते. त्यामुळेच तात्कालिक विचारप्रवाहांनी परिपूर्ण असें वाङ्मय त्याकाळीं प्रशंसिलें गेलें, तरी त्यांत मूलभूत मानवी भावनांचा सुंदर आविष्कार असल्याखेरीज तें चिरकालीन स्वरूपाचें होणार नाही.

दुसरी शंका अशी कीं, " एका विवक्षित परिस्थितींत आवडलें, तें चिरकालीन कसोटीचा निकष लावून खरोखरच कमी प्रतीचें ठरवितां येईल काय ? " याला उत्तर असेंच देतां येईल कीं, काव्याचा दर्जा ठरवतांना त्यांतील काव्यविषयक गुणांचा प्रथम विचार करणें आवश्यक आहे. आनंद हा एकजिनसीच असतो. त्याच्या पायऱ्या बाह्य परिस्थितीचे नियम लावून ठरविल्या जात नाहीत, मानसिक परिणामावरून ठरविल्या जातात. एका वस्तूपासून प्रत्येकाला आनंद मिळत असला तरी व्यक्तिपरत्वें त्याची जात (Quality) अगर प्रमाण (Intensity) ठरविलें जातें. 'आजच्या युगांत मुद्रणसुलभतेमुळे वाङ्मय 'टाकाऊ' असलें, तरी 'टिकाऊ' होतें. पण कपाटाच्या कोपऱ्यांत पडून राहणें म्हणजे टिकणें नव्हे ! तर लोकांच्या वाचनांत आणि स्मरणांत सदैव असेल तें टिकाऊ खरें विदग्ध-वाङ्मय होय ! पण तीच एकमेव कसोटी म्हणतां येणार नाही. मूलभूत मानवी व्यापारांचा सुंदर आविष्कार हाच एक निकष म्हणावा लागेल. बहुधा असें वाङ्मय स्थलकालनिरपेक्ष असतें

" आणि मग आपलें आधुनिक मराठी काव्य पाहिलें कीं, मन उदासीन होतें. " याला कारणें दोन सुचवलीं आहेत. (१) आजची कविताच कमी दर्जाची असेल; किंवा, (२) रसिक मनाच्या वाढत्या अपेक्षा पुऱ्या करावयाला ती असमर्थ असेल. त्यांना त्यांतील आवेश उसना आणि उथळ दिसतो.

उलट मागच्या वर्षांतील काव्याचा आढावा घेतांना प्रा. अदवंत म्हणतात— " या काळांतील कवींची दृष्टि अधिक विशाल होऊं लागली—त्यांच्या अनुभूतींचीं क्षेत्रें वाढलीं........आजच्या राजकीय व काही अंशीं सामाजिक जीवनाशीं आजचे कवि अधिकाधिक एकरूप होत आहेत. केशवसुतांच्या काव्यविषयक कल्पनांमध्ये जी भावना, जो त्वेष व आवेश दिसून येतो, तोच या कवींच्या काव्यांतहि मोठ्या प्रमाणांत दिसून येतो. "

आतां या प्राध्यापकद्वयांपैकीं कुणाचें मत प्रमाण मानावें !

दुसऱ्या कारणाचा (प्रा. रेगे यांच्या दृष्टीनें सयुक्तिक) विचार करूं लागल्यास

 मन साशंक होतें. रसिक मनाच्या काव्यविषयक अपेक्षा वाढताहेत काय ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रामाणिकपणें काव्याचें परिशीलन करणारे वाचक सध्यातरी किती आढळतात ? रसिक मनाच्या 'वाढत्या' अपेक्षा 'फिल्मी' संगीतापुरत्याच मर्यादित दिसतात. त्याच पुऱ्या करण्याच्या मागे कित्येक कवि लागले आहेत. त्यामुळे त्यांना 'पैसा आणि प्रसिद्धि' पुरेपुर लाभत आहे. जे थोडे 'इमान' राखून लिहितात, त्यांच्या काव्यांतील 'प्रक्षोभ' रेगे यांना उसना व 'प्रचारकी' स्वरूपाचा वाटतो. उलट-पक्षीं प्रा. अद्वंत म्हणतात—"मागील कवींपेक्षा पुढील कवींनी निःसंशय एक पाऊल पुढेच टाकलें आहे." यावरून काय समजायचें !

आजच्या कवितेचे त्यांनी स्थूलमानाने चार भाग पाडले आहेत— १ अंगार–अश्रु–रक्तांचिंधड्या काव्य. २ मानवता–क्रान्ति काव्य. ३ पारिजात काव्य. ४ खोटीं जानपद गीतें.

पहिल्या दोन विभागांबद्दल त्यांचें मत असें आहे की, कवी दोन भूमिका घेत असतात— घेतांना दिसतात; (अ) क्रान्तीच्या पुजाऱ्याची व (ब) 'भारा'ची. पण दोन्हींच्याहि भूमिकेंत अंतरीचा जिव्हाळा नसल्यामुळे तीं लोकप्रिय होत नाहीत. यावरून काय अनुमान काढावें ? प्रा. महाशयांना कवीच्या भूमिकेचा नीट उलगडा झाला नाही, असें म्हणावें काय ? पण, ते स्वतःच कवि आहेत. वास्तविक 'कवि ही एक अत्यंत आत्मनिष्ठ व्यक्ति' ही त्यांची कल्पना बरोबर आहे व बरेच कवि आत्मनिष्ठ आहेत. यांत संशय नाही. कवीची आत्मनिष्ठा केवळ कशाहि परिस्थितींत प्रेमगीतें खरडण्यांतच प्रतीत होत नाही. कवि हा हाडामासांचा पुतळा असतोच. त्याला संस्कारक्षम मन असतें. उलट तें फारच संवेदनाक्षम असल्यामुळे भोवतालच्या परिस्थितीचा परिणाम त्याच्यावर झाल्यावाचून राहील तरी कसा ? याबाबत श्री. खांडेकरांचे विचार मननीय आहेत. ते म्हणतात— "पतिप्रेम, पत्नीप्रेम, अपत्यप्रेम— इत्यादिकांच्या विकासाला आजच्या जगांत जागाच नाही. बाहेर पिठासारखें चांदणें पडलें असलें, तरी घरांत पिठाची भ्रांत असल्यावर त्या चांदण्यांत गात गात फिरायला जाण्याची लहर कुठल्या दांपत्याला येईल ! .... युद्धें थांबल्याशिवाय मनुष्याला मनुष्य म्हणून जगतां येणार नाही........मातेच्या वत्सल हृदयाने समाधानाने जगाला अंगाई–गीत म्हणावें अशी परिस्थिति उत्पन्न होणार नाही,—आणि प्रीति, त्याग, ध्येय इ. सुकोमल भावनांचा पदोपदीं चोळामोळा झाल्याशिवाय राहणार नाही. समतेच्या पायावर उभारलेल्या उद्याच्या नव्या जगांत या भावनांना फुलोरा येईल. हें उद्याचें जग निर्माण करण्याचा प्रयत्न करणें हेंच आजच्या जगांतल्या सज्जनाचें आणि बुद्धिमंतांचें काम आहे." उद्याचें जग निर्माण करण्याचें कार्य कवीचें नाही, असें धरून चाललें, तरी "थिजली रक्ताची थारोळी; त्यांत चंद्र हिरवा। क्रूर धुंद लज्जास्पद वैभव दावित थरथरला"—हें अवलोकून कुठलाहि सात्त्विक माणूस—"आंधळ्या बुद्धीचे, पांगळ्या वृत्तीचे, खुळ्या कल्पनांचे, खोट्या कर्तृत्वाचे रडके पूजक ओरडतात हे शान्तिः शान्तिः ओरडू द्या त्यांना, आम्ही गर्जणार—क्रान्तिः क्रान्तिः क्रान्तिः" असं ओरडल्यावाचून राहूं शकणार नाही. आजचें आवेशयुक्त काव्य कांहीसें अशाच स्वरूपाचें आहे.

मला हेंच म्हणावयाचें आहे की, आजच्या काव्यांतील प्रक्षोभ खरा असून प्रचार तदनुषंगाने आलेला असावा. ज्या 'निर्वासित चिनी मुलास' पाहून प्रा. रेगे यांना प्रचार दिसला त्याबद्दल दुसरे म्हणतात की, या काव्याच्या लावण्याला तोड नाही. जें काव्य वाचून त्यांना 'किळस' येते, तेंच काव्य कितीतरी श्रद्धेने वाचलें

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जातें, त्याचा परिणाम जो व्हावयाचा तो होतो. कुसुमाग्रजांनी ' डमडमच्या तुरुंगांतून ' पाठविलेल्या निरोपाने एखाद्याच्या भावना थरारून उठत नसतील, तर तो दोष कोणाचा ! ज्या बायरनचा युरोपांत एवढा ' उदोउदो ' करण्यांत येतो, त्याच्या काव्यांत तरी वेगळें काय आढळतें ?

केवळ बहुजन समाज सिनेमांतील गाण्यांप्रमाणे तीं गात नाही, एवढ्यावरूनच त्यांत जिव्हाळा नाही, असे म्हणणें धोक्याचें व धाडसाचें आहे. आजचा सर्वसामान्य माणूस जीवनाच्या अंगोपांगांत होणाऱ्या क्रान्तीपासून पलायन करण्याचा प्रयत्न करीत असतो. म्हणूनच वास्तवतेकडे दुर्लक्ष्य करून, जाणून बुजून तो खोट्या स्वप्नसृष्टींत रममाण होण्याचा प्रयत्न करीत असतो.

पारिजात काव्य म्हणजे आजचें प्रेमकाव्य असें म्हणावयास हरकत नाही. शृंगाराला पूर्वीपासून ' रसराज ' असें संबोधण्यांत येतें. आणि, मानवी जीवनांतहि त्याचें स्थान उच्चच आहे. निवृत्तीकालीं याचा ओघ काहीसा भक्तीकडे वळला होता, सध्या तो पुन्हा शृंगाराकडे म्हणजे आपल्या मूळ स्वरूपाकडे येत आहे. सध्या ओवी काव्याची नक्कल होत आहे, असें म्हणणें सयुक्तिक नाही. तो एक सोपा प्रकार— गद्यवजा— असल्यामुळे पेलण्यास जड नाही, हीच गोष्ट याच्या मुळाशी असावी. नवशिके याचा उपयोग करतात, यावरून या विधानाला पुष्टीच मिळत नाही काय ! याहून जास्त या प्रकाराबद्दल म्हणावयाची आवश्यकता दिसत नाही.

जानपद गीतांची प्रवृत्ति फारच अल्प प्रमाणांत आढळते. वास्तविक अशीं गीतें जानपदांतून निर्माण व्हावयास पाहिजेत. कित्येक दिवस याच प्रकारचें शाहिरी वाङ्मय निर्माण होत होतें. आजचे कवि तशा प्रकारचे वाङ्मय—कविता—लिहीत आहेत. पण प्रा. रेगे यांनी म्हटल्याप्रमाणे शहरी भावना आणि खेडवळ—जानपदांतील—भावना वेगळ्या नसतातच, ह्या गोष्टी ते विसरतात. प्रेम करण्याचा मक्ता, प्रियाराधनाचा हक्क, केवळ सुसंस्कृत समाजानेच घेतला आहे, असें नाही. प्रत्येक माणसांत काम, क्रोध, मोह, मद, मत्सरादि भावना असतातच. त्यांचाच आविष्कार निरनिराळ्या स्वरूपांत होत असतो. श्री. माडगूळकर, पारधी, गोरे, ना. घ. देशपांडे इ. कवींनी खेडवळ जीवनाचा अनुभव घेतला आहे. त्यांच्याच भावना त्यांच्याच शब्दांत व्यक्त केल्या आहेत. त्यांत आवेश नसतो, त्वेष नसतो. मूलभूत भावनांचा त्यांच्या शब्दांत आविष्कार असतो, एवढेंच !

सामान्यतः असें म्हणतां येईल की, आजच्या काव्यांतील दोषांना कारणें दोन आहेत; एक, आघाडीवरील सर्व कवि नवोदित आहेत, आणि दुसरें, सामाजिक अभिरुचीचा भयंकर अधःपात होत आहे. सोन्याशेजारीं राहून उजाळा मिळत नाही, पण शेणाशेजारीं चटकन् डाग पडतात ! अभिरुचीलाहि चांगलें वळण लावणें कठीण आहे. उलट, तिचा अधःपात क्षणांत होतो. मानवी मनाची ठेवणच तशी आहे. प्रसिद्धि आणि पैसा यांच्या प्रलोभनामुळे बरेच प्रथितयश कवि स्वतःला करारानें बांधून घेत आहेत. तरी त्यांच्या प्रतिभेची चमक मधून मधून दिसून आल्याशिवाय राहत नाही. ' रामराज्यां 'तील राजा बढे यांचीं गीतें व माडगुळकरांच्या कांहीं लावण्या उदाहरणादाखल दाखवितां येतील.

शेवटीं रेगे यांच्या प्रमाणेंच असें म्हणतां येईल की, भविष्यांत आत्मनिष्ठ बनून कोणत्याहि प्रलोभनाला बळी न पडतां मराठी कवि काव्य प्रसवतील तेव्हां अपेक्षित असें उच्च दर्जाचें काव्य आपोआपच निर्माण होईल. ●●●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय   लेखनाची तारीख १५ ऑगष्ट १९४८

जुलै-ऑगस्टचा जोड-अंक

‘ युगवाणी ’चा एप्रील-मेचा जोड-अंक काढल्यानंतर पुनः लगेच जुलै-ऑगस्टचा जोड-अंक काढण्याची पाळी येईल, असे वाटले नव्हतें ! पण छापखान्याच्या अडचणींमुळें तसें करणें प्राप्त झालें आहे, याबद्दल मी अत्यंत दिलगीर आहें ! ‘ युगवाणी ’चें नेहमीचें अनियमित प्रकाशन व त्यांतच निघणारे हे जोड-अंक यांमुळें वर्गणीदार, विदर्भ-साहित्य-संघाचे कार्यकर्ते व सभासद आणि लेखक हे सर्वच अत्यंत नाराज होत आहेत, याची मला पूर्ण जाणीव आहे. परंतु परिस्थितीपुढे हात टेकावे लागत आहेत इतकें म्हणण्यापलीकडे मी जास्त काय करूं शकतों ?

खुद्द प्रकाशक रा. ठाकूर यांसहि सर्व गोष्टींची जाणीव आहे. ते पदराला खार लावून ‘ युगवाणी ’ प्रसिद्ध करीत आहेत, तेव्हा ग्राहक-वगैरे नाराज होणें म्हणजे आपलेंच नुकसान करून घेणें होय, हें त्यांच्यासारख्या व्यवहारज्ञांस कळत नसेल, असें कसें म्हणावें ? परंतु कांही गोष्टींपुढे त्यांचाहि निरुपाय होत असला पाहिजे, हें उघड आहे ! मनुष्य हा परिस्थिति-शरण आहे आणि जाणूनबुजून कुणीहि स्वतःच्या नुकसानींत पर्यवसान होईल अशा गोष्टी करीत नाही, एवढें रा. ठाकूर यांच्या वतीने खासच म्हणतां येईल.

स्वातंत्र्याचा वाढदिवस

आज १५ ऑगस्ट. गतवर्षी याच तारखेला हिंदुस्थान खंडित होऊन स्वतंत्र झाला ! गेल्या वर्षांत अशा कांही भीषण घटना घडल्या की, त्यांच्या केवळ स्मरणानेहि अंगावर शहारे येतात ! यामुळे स्वातंत्र्याचा हा पहिला वाढदिवस निर्भेळ आनंदाचा वाटत नाही. तशांत मध्यम व कनिष्ठ वर्ग यांची स्थिति दिवसेंदिवस इतकी कष्टाची होत आहे की, अन्नाने जिणें कंठणें त्यांस कठिण होत आहे ! भांडवलदार व व्यापारी, मोठे जमीनदार आणि बडे सरकारी अधिकारी—यांच्या खेरीज सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें आहे ! मध्यम वर्ग तर नष्टच होतो की काय, अशीहि भीति वाटत आहे ! ‘ श्रीमंत हे अधिक श्रीमंत होणें व गरीब हे अधिक गरीब होणें ’-हेंच जर स्वराज्यांतहि जीवनसूत्र असलें, तर तें स्वराज्य मुळीं मध्यम व कनिष्ठ वर्गासाठी नव्हेच, असा निष्कर्ष काढल्यावांचून गत्यंतर नाही !

आमच्या सत्तारूढ पुढाऱ्यांना आणखी वेळ द्या, ते ही विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न करतील, असें सांगण्यांत येतें ! पण सध्याच्या सरकारच्या हालचाली आर्थिक विषमता दूर करण्याच्या दृष्टीने होत आहेत काय, हाच तर प्रश्न आहे !

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाविदर्भाचा स्वतंत्र उपप्रांत !

पुणें येथे नुकतीच संयुक्त-महाराष्ट्र परिषदेच्या कार्यकारिणीची सभा झाली. त्यांत संयुक्त महाराष्ट्रामध्ये महाविदर्भाचा निराळा उपप्रांत करण्यास संमति देण्यांत आली. हा निर्णय अकोला–कराराला अनुसरून घेण्यांत आला आहे, हें स्पष्ट आहे. पण अकोला–करारांत तरी महाविदर्भाचा उपप्रांत करण्याचें कलम का टाकण्यांत आलें, हें पुष्कळांस कळत नाही ! नामदार माधवरावजी अणे यांजसारखे महाविदर्भाचे हितेच्छू मुत्सद्दी अकोला–करार करणारांमध्ये होते. तेव्हां त्यांच्या दृष्टीने हें कलम महाविदर्भाच्या हिताचें असावें, यांत शंका नाही. परंतु माझ्यासारख्याच्या मताने, संयुक्त महाराष्ट्र हा एकच सलग प्रांत असावयाला हवा होता ! कदाचित् हा विचार महाविदर्भाच्या हितास बाधक असेल, नाही असें नाही. परंतु पुष्कळांच्या मनांत असलेलाच विचार मी येथे बोलून दाखवीत आहे, एवढें म्हटलें, म्हणजे पुरे.

●

संघवार्ता

प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी,
सरचिटणीस
वि. सा. संघ यांजकडून

'युगवाणी 'च्या एप्रिल–मे ४८ च्या अंकांत ता. ७-३-४८ रोजीं अमरावती येथे भरलेल्या साधारण सभेचा व कार्यकारी मंडळाच्या सभेचा वृत्तान्त आलाच आहे. त्यानंतर नागपूर येथे ता. ९-८-४८ रोजीं का. मं. ची सभा झाली. ही सभा यंदाच्या वि. सा. संमेलनासंबंधी आणि वि. सा. संघाच्या रौप्य–महोत्सवासंबंधी विचारविनिमय करण्याकरिता प्रामुख्याने भरविण्यांत आली होती.

गेल्या मार्च महिन्यांत गोन्दिया येथे वि. सा. संमेलन भरणार होतें. परंतु राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या खुनामुळे सबंध राष्ट्रांत जें औदासीन्याचें व दुःखाचें वातावरण निर्माण झालें आणि त्याचमुळे गोन्दिया येथे जी प्रतिकूल परिस्थिति निर्माण झाली तिच्यामुळे तेथील स्वागत मंडळाला वि. सा. संमेलन त्यावेळीं स्थगित करावें लागलें. आता ती परिस्थिति निवळल्यामुळे गोन्दिया येथे पुन: वि. सा. संमेलन भरविण्याचा तेथील स्वागत मंडळाने निर्णय घेतला; आणि या निर्णयाला वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची संमति मिळावी अशी इच्छा व्यक्त केली. या परिस्थितीवर विचार करण्याकरितांच ता. ९-८-४८ रोजीं नागपूर येथे का. मं. ची सभा बोलावण्यांत आली होती. या सभेला गोन्दियाचे रा. वी. अ. लिमये, रा. घोटे, रा. बापट हेहि उपस्थित होते. या सभेने खालीलप्रमाणे निर्णय घेतले.

१. गोन्दिया येथे संमेलन भरविण्यासाठी परवानगी देण्यांत यावी.

२. याच वेळेला वि. सा. संघाचा रौप्य–महोत्सव साजरा करण्यांत यावा.

३. रौप्यमहोत्सवाचे व इतर कार्यक्रम गोन्दिया येथील कार्यकारिणीने पुढील समितीच्या सल्ल्याने ठरवावे.—

समिती—१. डॉ. वि. भि. कोलते
२. प्रा. श्री. ना. बनहट्टी
३. रा. पु. य. देशपांडे
४. ,, वीं. अ. लिमये
५. ,, रा. पु. समदेव (आमंत्रक)

४. संमेलन दिवाळीच्या सुटींत भरविण्यांत यावें. तारखा साधारणपणें सुटीचे दिवस पाहून आरंभीच्या किंवा शेवटच्या निश्चित करण्यांत याव्या.

गोन्दियाचें वि. सा. संमेलन यशस्वी करा.

अनेक महत्त्वाच्या कारणांस्तव वि. सा. संघाच्या का. मं. ने हा जो निर्णय घेतला त्याला प्रांतांतील सर्व मराठी भाषाभिमानी जनतेकडून पाठिंबा मिळून गोन्दियाचें वि. सा. संमेलन सर्वांगीण यश संपादन करील असा का. मं. ला भरंवसा वाटतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104|Genl I A अन्वयें 'युगवाणी' मासिकास लायब्ररीसाठी मंजूरी दिली आहे.

'रीटा'मुळे आकर्षक केस-उगवतात

केससमृद्धीसाठीं 'रीटा' हें एक नवीन साधन आहे. केसाच्या मुळांतील नैसर्गिक स्रवणास त्याने पोषण होतें. खवड्यास व टक्कलास अटकाव होऊन अनुपम सौंदर्याचे लांब सुंदर केस उगवतात. त्याने खराब केसांना सुंदर चकाकी मिळते आणि वाकड्या केसासाठी तें उत्तम आहे. 'रीटा'ची एक बाटली घेऊन तुमच्या केसांना अनुपम सौंदर्य द्या.

एका बाटलीची किं. १५आणे.

× प्रत्येक ठिकाणीं मिळतें. ×

RITA
HAIR TONIC

उत्तर हिंदुस्थानी सिनेतारका तुम्हांला काय सांगतात ?

ललिता पवार:-ज्यांना उत्तमपैकी केशवर्धक हवें असेल, त्यांना मीं "रीटा" वापरून पहाण्याची शिफारस करतें. आणि, मला खात्री आहे की, यावरून आपली मातृभूमि किती उत्तमोत्तम वस्तू तयार करूं शकते हें त्यांना कळून येईल.

शारदा जुन्नरकर:-मी माझ्या केसासाठी "रीटा" वापरण्यास सुरवात केली यायोगें माझे केस जाण्याचें जादूप्रमाणें थांबलें. 'रिट्यां' त केस नरम करणारीं व त्यांन रेशमाप्रमाणें तकाकी आणणारीं अनेक द्रव्यें असून मीं खात्रीपूर्वक म्हणूं शकतें कीं, "रीटा" हें एक अद्‌भुत केशवर्धक आहे.

के. ईश्वरलाल:-मी एकदां "रीटा" वापरलें व त्यानंतर माझ्या कुटुंबांतील सर्वत्र मंडळींना "रीटा" वापरण्याची संवयच लागली. माझ्या मित्रांना केशवर्धकांमध्यें "रीटा" हेंच पसंत पडेल ही खात्री आहे.

व्हेटो कंपनी, जोन्स स्ट्रीट, मद्रास.

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९। ४२५ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ